# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १९० वा ❑ भारतीय सौर दिनांक २२ भाद्र. शके १९४८, रविवार दि.१३ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ८ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## जिद्दीची गरुडझेप:....

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

अपंगत्वावर मात करत १७ वर्षीय संतोषचा आयआयटी मद्रासपर्यंतचा प्रवास!

आयुष्यात नियतीने मांडलेला खेळ कितीही क्रूर असला, शरीराने प्रत्येक पावलावर मर्यादा आखून दिल्या आणि परिस्थितीने पावलोपावली अडथळे उभे केले, तरी अथांग इच्छाशक्ती व अखंड चिकाटीच्या जोरावर भाग्याची रेषा स्वतःच्या हातांनी नव्याने लिहिता येते, याचे जिवंत व प्रेरणादायी प्रतीक म्हणजे चेन्नईचा १७ वर्षीय तरुण जे. संतोष. जन्मतःच सेरेब्रल पाल्सी आणि तब्बल ९० टक्के स्पायनल मस्क्युलर डिसॅबिलिटी यांसारख्या अत्यंत गुंतागुंतीच्या व गंभीर शारीरिक आव्हानांनी घेरलेल्या संतोषसाठी रोजचे सर्वसामान्य जगणेही एका मोठ्या संघर्षासारखे होते. स्वतःच्या पायांवर उभे राहणे अथवा चालणे तर दूरच, साधे ताठ बसणे किंवा दैनंदिन हालचाली करणेही ज्याच्यासाठी प्रचंड वेदनादायी आणि परावलंबी होते, अशा मुलाने देशातील तंत्रशिक्षणाचे सर्वोच्च शिखर मानल्या जाणाऱ्या आयआयटी मद्रास मध्ये प्रवेश मिळवून अशक्य कोटीतील गोष्ट शक्य करून दाखवली आहे. संतोषच्या या यशाची दखल खुद्द आयआयटी मद्रासने आपल्या अधिकृत मंचावरून घेतली असून, देशभरातून त्याच्या या ऐतिहासिक जिद्दीला सलाम केला जात आहे.

संतोषचा हा प्रवास केवळ शैक्षणिक यशापुरता मर्यादित नसून तो एका कौटुंबिक त्यागाची, अपरिमित कष्टांची आणि आत्मविश्वासाची गाथा आहे. संतोषचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत दिवस काढत होते. त्याचे वडील चेन्नईच्या रस्त्यांवर रात्रंदिवस ऑटोरिक्षा चालवून कुटुंबाचा गाडा हाकत असत. तुटपुंज्या उत्पन्नात औषधोपचार आणि घराचा खर्च भागवताना वडिलांनी मुलाच्या शिक्षणात कधीही खंड पडू दिला नाही. दुसरीकडे, संतोषच्या आईने आपले संपूर्ण आयुष्यच त्याच्या सेवेसाठी समर्पित केले. उठण्या–बसण्यापासून ते वह्या–पुस्तके हातात देण्यापर्यंत प्रत्येक क्षणी ती त्याचा भक्कम आधार बनून पाठीशी उभी राहिली. आई–वडिलांच्या या निःस्वार्थ कष्टांची आणि घामाच्या प्रत्येक थेंबाची जाणीव संतोषला शालेय वयापासूनच होती, ज्यामुळे त्याच्यातील शिकण्याची आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची जिद्द अधिकच प्रखर होत गेली.

या अद्भूत यशाची बीजे एका अत्यंत हळव्या आणि भावनिक घटनेत रोवली गेली होती. सुमारे वर्षभरापूर्वी संतोषच्या शाळेने विद्यार्थ्यांसाठी आयआयटी मद्रासच्या ऐतिहासिक कॅम्पसच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. वर्गातील सर्व मुले उत्साहाने सहलीला गेली, मात्र गंभीर शारीरिक मर्यादा आणि व्हिलचेअरवरील परावलंबित्व यामुळे संतोषला त्या सहलीला जाता आले नाही. सहल संपवून परतलेल्या मित्रांनी जेव्हा आयआयटी परिसराचे, तिथल्या अत्याधुनिक प्रयोगशाळांचे आणि शैक्षणिक वातावरणाचे वर्णन संतोषला ऐकवले, तेव्हा त्याचे मन काही काळ प्रचंड हळवे झाले. परंतु, त्या हुकलेल्या संधीचे रूपांतर त्याने निराशेमध्ये होऊ दिले नाही; उलट तिथूनच त्याच्या मनात एक ठिणगी पडलीएक दिवस आपण या संस्थेत केवळ एक प्रेक्षक किंवा पर्यटक म्हणून नव्हे, तर याच प्रतिष्ठित संस्थेचे अधिकृत विद्यार्थी म्हणून पाऊल ठेवायचे.

सुरुवातीला त्याने आयआयटीच्या पारंपारिक संयुक्त प्रवेश परीक्षेची तयारी करण्याचा विचार केला होता. मात्र, दररोज सातत्याने कोचिंग क्लासला जाणे, तासनतास बसून अभ्यास करणे आणि परीक्षेचा शारीरिक ताण पेलणे त्याच्या प्रकृतीला झेपणारे नव्हते. त्यामुळे त्याने तो मार्ग बाजूला ठेवून आपल्या शालेय अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित केले. प्रचंड बुद्धिमत्ता आणि अभ्यासातील सातत्याच्या जोरावर त्याने बारावीच्या परीक्षेत आपल्या संपूर्ण शाळेत प्रथम क्रमांक पटकावून सर्वांना थक्क केले. निकालाच्या याच काळात त्याच्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्याला आयआयटी मद्रासने सुरू केलेल्या डेटा सायन्स अँड ॲप्लिकेशन्स या चार वर्षांच्या अभिनव बॅचलर ऑफ सायन्स पदवी अभ्यासक्रमाबद्दल माहिती दिली. पुढे माहिती शोधत असताना संतोषला आयआयटी मद्रासच्या सामाजिक उपक्रम व पोहोच विभागाचे प्रमुख हरी कृष्णन यांचा आयआयटीएम फॉर ऑल या उपक्रमाविषयीचा एक प्रेरणादायी व्हिडिओ सापडला. त्या व्हिडिओने संतोषला एका अंधाऱ्या वाटेवर प्रकाशाचा किरण दाखवला.

हा अभ्यासक्रम संतोषच्या परिस्थितीसाठी जणू वरदानच ठरला, कारण यासाठी दररोज कॉलेजच्या वर्गात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची सक्ती नव्हती; बहुतांश शिक्षण घरबसल्या ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करण्याची मुभा यात होती. रोजच्या प्रवासाची आणि शारीरिक कष्टांची अडचण दूर झाल्याने संतोषने या संधीचे सोने करण्याचे ठरवले. मात्र, संघर्षाची मालिका इथेच संपली नाही. ऑनलाइन अर्ज भरताना त्याला अनेक तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागला. त्यावेळी त्याच्या कुटुंबाला मूलभूत गरजांसाठी मदत करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेने त्याला तामिळनाडू व्हॉलंटियर्सशी जोडून दिले. संतोषची तळमळ पाहून हरी कृष्णन यांनी स्वतः जातीने त्याच्या घरी भेट दिली, त्याच्या अर्जातील तांत्रिक त्रुटी दूर केल्या आणि त्याला आवश्यक ते सर्व मार्गदर्शन केले. स्वयंसेवकांच्या चमूने त्याला आयआयटीच्या अवघड पात्रता परीक्षेसाठी विशेष प्रशिक्षण दिले. पहिल्या प्रयत्नात त्याला अपयश आले, परंतु संकटांना न घाबरणाऱ्या संतोषने पुन्हा जोमाने अभ्यास केला आणि दुसऱ्या प्रयत्नात अत्यंत चमकदार कामगिरी करत ही पात्रता फेरी यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली.

संतोषच्या या अजोड जिद्दीचा सन्मान करत आयआयटी मद्रास आणि तामिळनाडू व्हॉलंटियर्स या संस्थेने त्याच्या पहिल्या वर्षाच्या संपूर्ण शैक्षणिक शुल्काचा भार उचलला असून, त्याला अत्याधुनिक आर्टिफिशिअल इंटेलिजन्स प्रशिक्षण देण्याची जबाबदारीही स्वीकारली आहे. या ऐतिहासिक यशाने हुरळून न जाता संतोषने आपल्या पुढील वाटचालीचे नियोजनही आखून ठेवले आहे. डेटा सायन्सची ही पदवी पूर्ण करून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात घरून काम करण्याची एक चांगली नोकरी मिळवणे, जेणेकरून आपल्या वृद्ध आई–वडिलांना राजा–राणीसारखे सुखी, सन्माननीय व स्वाभिमानी आयुष्य जगता येईल, हे त्याचे सर्वात मोठे स्वप्न आहे. एवढ्यावरच न थांबता, भविष्यात गेट परीक्षा उत्तीर्ण होऊन उच्च पदव्युत्तर शिक्षण घेण्याचाही त्याचा मानस आहे.

शाळांनी बारावीच्या स्तरावरच अशा ऑनलाइन व लवचिक पदवी अभ्यासक्रमांची माहिती ग्रामीण आणि विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी, जेणेकरून माहितीअभावी कोणाचीही स्वप्ने अपूर्ण राहणार नाहीत, असा महत्त्वपूर्ण संदेश संतोष इतर विद्यार्थ्यांना देतो. एका वर्षापूर्वी जी संस्था पाहण्याची संधीही हुकली होती, त्याच आयआयटी मद्रासचा सन्माननीय विद्यार्थी बनून संतोषने आज नवा इतिहास रचला आहे. प्रतिकूलतेवर मात करू पाहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आणि शारीरिक मर्यादांशी झुंजणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी जे. संतोषचा हा लढाऊ प्रवास जिथे इच्छा तिथे मार्ग या उक्तीचे चिरंतन उदाहरण बनून कायम प्रेरणा देत राहील.

# ‘येवा येवा शिरी गनेस देवा’ मधून कोकणच्या लोकसंस्कृतीचा जागर

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई – गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानिमित्त महाराष्ट्राच्या विविध भागांतील लोकपरंपरा, लोककला आणि सांस्कृतिक वारसा रसिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने ‘येवा येवा शिरी गनेस देवा’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी मंदिर, दादर, मुंबई येथे हा कार्यक्रम होणार आहे.

मालवणी मुलुखातील गणेशोत्सवाची गीत, संगीत आणि पारंपरिक लोककलांच्या माध्यमातून अनुभूती या कार्यक्रमातून रसिकांना घेता येणार आहे. गीत रचना व संहिता महेश केळुसकर, संगीत मिथिलेश पाटणकर आणि अभिसंवाद सुप्रिया विनोद मंगेश सातपुते यांचे आहे. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून गावचे भजन सादर करण्यात येणार आहे.

श्री दत्तगुरु प्रासादिक भजन मंडळ, कणकवली यांच्याकडून भजनाचे सादरीकरण करण्यात येणार असून बुवा उदय पारकर भजन सादर करणार आहेत. पखवाजावर श्लोक चव्हाण साथसंगत करणार आहेत. तसेच घागरी फुंकणे, टिपऱ्या आणि फुगड्या या पारंपरिक लोककला प्रकारांचा आविष्कार स्वयंसिद्धा महिला मंडळ सादर करणार आहे.

या सादरीकरणातून मालवणी मुलखातील गणेशोत्सवाची वैशिष्ट्यपूर्ण गीतपरंपरा, भक्तिसंगीत आणि पारंपरिक लोककलांचे दर्शन घडणार आहे. कोकणातील गणेशोत्सवातील भक्ती, उत्साह आणि लोकपरंपरेचा समृद्ध अनुभव मुंबईकर रसिकांना या कार्यक्रमातून घेता येणार आहे.


हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतील लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन व प्रसार करण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

‘येवा येवा शिरी गनेस देवा’ हा कार्यक्रम कोकणच्या लोकजीवनातील भक्ती, संगीत आणि पारंपरिक कलांचा संगम घडविणारा ठरणार आहे. कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.




# रसाळ प्रतिभेचे व्रतस्थ संपादक : संजय व्यापारी

ज्योतिर्मय साहित्य



काही व्यक्तिमत्त्वे आपल्या कर्तृत्वाने काळाच्या पानांवर आपली स्वतंत्र अक्षरे कोरतात. काही माणसे स्वतःच्या यशाचा दीप प्रज्वलित करून त्याच्या प्रकाशात इतरांच्या वाटाही उजळतात. संजय काशीनाथ व्यापारी हे अशाच प्रकाशवाटेवर अखंड प्रवास करणारे साहित्यप्रेमी, कुशल संपादक आणि व्रतस्थ साहित्यसेवक आहेत.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना मनात एक सुंदर प्रतिमा साकारते हाती अक्षरांची पणती, मनात साहित्याची ज्योत आणि डोळ्यांसमोर नव्या प्रतिभेला आकाश देण्याचे स्वप्न! शब्दांवर प्रेम करणारे आणि शब्दांच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवणारे संजय व्यापारी यांनी आपल्या आयुष्याची सुंदर वीण पत्रकारिता, साहित्य, कला आणि समाजसेवा या चारही धाग्यांनी विणली आहे.

१३ सप्टेंबर १९६४ हा त्यांच्या जीवनप्रवासाचा शुभारंभदिन. B.F.A. (Applied Art) या कलाशाखेतील शिक्षणाने त्यांच्या सौंदर्यदृष्टीला आणि सर्जनशीलतेला समृद्ध पाया दिला. रंग, रेषा, आकार आणि सौंदर्य यांची जाण त्यांच्या मनात आधीपासूनच रुजलेली होती. पुढे शब्दांच्या विश्वात प्रवेश करताना या कलादृष्टीला साहित्यिक संवेदनशीलतेची जोड लाभली आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक आगळे सौंदर्य प्राप्त झाले.

१९८६ ते १९९९ या काळात दैनिक लोकमतच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात भक्कम अनुभव संपादन केला. वृत्तपत्र हे समाजजीवनाचे प्रतिबिंब असते. त्या प्रतिबिंबातून माणूस, समाज, संस्कृती आणि काळ यांचा परिचय होत असतो. पत्रकारितेच्या या प्रदीर्घ प्रवासाने संजय व्यापारी यांच्या निरीक्षणशक्तीला, लेखनदृष्टीला आणि संपादकीय जाणिवेला व्यापक आकार दिला.

२००३ ते २०१३ या कालखंडात पुण्यनगरीशी जोडलेले कार्य त्यांच्या पत्रकारितेच्या प्रवासाला अधिक व्यापक आयाम देणारे ठरले. पत्रकारितेच्या अनुभवातून घडत असतानाच त्यांच्या मनातील साहित्यप्रेम अधिकाधिक गहिरे होत गेले.

या साहित्यिक जडणघडणीतील एक सुवर्णपान म्हणजे ‘पसायदान’ वाङ्मयीन मासिकाचा १९९९ ते २००३ हा कालखंड. या मासिकाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या साहित्य–सांस्कृतिक विश्वातील अनेक तेजस्वी व्यक्तिमत्त्वांचा सहवास त्यांना लाभला. हा सहवास म्हणजे एका साहित्यप्रेमी मनासाठी अक्षरशः अनुभवांचे विद्यापीठच होते.

वि. वा. शिरवाडकर, सुरेश भट, शिवाजी सावंत, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, वामन केंद्रे, ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, गिरीश कर्नाड, महावीर जोंधळे, बाबा भांड, फ. मुं. शिंदे, मंगला वैष्णव, डॉ. सुधीर रसाळ, सुधीर गव्हाणे, बाबा दळवी, इंद्रजित भालेराव, ब्रह्मानंद देशपांडे, छाया महाजन, चंद्रकांत भालेराव, अरविंद जगताप अशा दिग्गज साहित्यिक, कलावंत आणि विचारवंतांचा सहवास त्यांच्या साहित्यदृष्टीला समृद्ध करणारा ठरला.

या मान्यवरांच्या सहवासातून आलेली अनुभवसंपदा त्यांच्या मनात साठत गेली. साहित्याकडे पाहण्याची दृष्टी अधिक परिपक्व झाली. उत्तम साहित्याची ओळख, लेखकाच्या भावविश्वाचा आदर आणि वाचकांच्या अभिरुचीचा विचार या सगळ्यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या संपादकीय कार्यात दिसून येतो.

बालपणापासूनच त्यांच्या मनात साहित्याची ओढ आणि समाजसेवेची आस रुजलेली आहे. सतत कार्यरत राहणे, नवनिर्मिती करणे आणि आपल्या कार्यातून समाजाला काहीतरी देत राहणे हा त्यांच्या स्वभावाचा सुंदर पैलू आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही कार्यतत्परता त्यांच्या प्रत्येक उपक्रमाला ऊर्जा देत आली आहे.

साहित्याचा अधिकाधिक प्रचार आणि प्रसार व्हावा, दर्जेदार साहित्य व्यापक वाचकवर्गापर्यंत पोहोचावे, या ध्येयातून २७ जुलै २०२१ रोजी ‘आधुनिक केसरी’ या डिजिटल दैनिकाची स्थापना झाली. सुसज्ज यंत्रणा, अनुभवी सहकारी आणि निवडक दर्जेदार साहित्य यांच्या माध्यमातून ‘आधुनिक केसरी’ने अल्पावधीत व्यापक वाचकविश्व निर्माण केले.

महाराष्ट्र, भारत आणि भारताबाहेरील मराठी वाचकांपर्यंत साहित्य पोहोचविण्याच्या या प्रवासात संजय व्यापारी यांनी युनिट हेड आणि व्यवस्थापकीय संपादक म्हणून महत्त्वपूर्ण योगदान दिले. डिजिटल माध्यमाच्या सामर्थ्याची जाणीव ठेवून त्यांनी साहित्य आणि वाचक यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी प्रभावी कार्य केले.

त्यांच्या मनातील साहित्यसेवेची ज्योत पुढे अधिक तेजस्वी झाली आणि २६ जानेवारी २०२५ रोजी ‘ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ’ या ई–पेपरचा शुभारंभ झाला.

‘ज्योतिर्मय’ या नावातच प्रकाशाचे तत्त्व सामावलेले आहे. या प्रकाशाची व्याप्ती आज महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून जगभरातील मराठी मनांपर्यंत पोहोचली आहे. ७० हजारांहून अधिक दैनंदिन वाचक ‘ज्योतिर्मय’शी जोडले गेले आहेत. ही संख्या म्हणजे एका साहित्यिक संकल्पनेला मिळालेला व्यापक वाचकप्रतिसाद आणि संजय व्यापारी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मिळालेली सुंदर दाद आहे.

‘ज्योतिर्मय’ हे नव्या लेखणीसाठी विश्वासाचे घर, नव्या प्रतिभेसाठी खुले आकाश आणि मराठी साहित्याच्या प्रसारासाठी प्रभावी माध्यम ठरले आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील तसेच जगभरातील मराठी लेखक–कवींना आपले साहित्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याची संधी या व्यासपीठातून मिळत आहे.

एखाद्या नवोदित कवीच्या मनातील पहिली कविता वाचकांपर्यंत पोहोचते, एखाद्या लेखकाच्या विचारांना नवा वाचकवर्ग लाभतो, एखाद्या साहित्यिकाच्या स्वप्नाला पुस्तकाचे रूप मिळतेया प्रत्येक क्षणामागे संपादकीय आस्था, साहित्याविषयीचा आदर आणि नव्या प्रतिभेवरचा विश्वास कार्यरत असतो.

संजय व्यापारी स्वतःही समर्थपणे लेखणी चालवतात. त्यांच्या साहित्यनिर्मितीतून सुमारे १५० कविता, १६० नवीन ‘श्री मनाचे श्लोक’ आणि वास्तवजीवनाशी निगडित अनेक लेख वाचकांसमोर आले आहेत. संपादक आणि लेखक या दोन्ही भूमिका त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अत्यंत सुंदरपणे एकरूप झालेल्या आहेत. म्हणूनच लेखकाच्या मनातील भाव, त्याच्या लेखणीची धडपड आणि साहित्यकृतीची अंतःप्रेरणा त्यांना अधिक जवळून जाणवते.

साहित्यसेवेचा हा यज्ञ अधिक व्यापक व्हावा, लेखकांना स्वतःचे हक्काचे प्रकाशन व्यासपीठ मिळावे, या संकल्पनेतून ऑक्टोबर २०२५ मध्ये पुणे येथे ‘ज्योतिर्मय प्रकाशन’ संस्थेची स्थापना झाली. अल्पावधीतच या संस्थेने २४ पुस्तके प्रकाशित केली आहेत.

ही २४ पुस्तके म्हणजे केवळ मुद्रित पृष्ठांचा संच नव्हे; ती २४ साहित्यिक स्वप्नांची साकारलेली रूपे आहेत. २४ लेखणींच्या प्रवासाला मिळालेली अक्षरांची पंखे आहेत. २४ लेखकांच्या सर्जनशीलतेला लाभलेली प्रकाशाची वाट आहे.

‘ज्योतिर्मय प्रकाशन’च्या माध्यमातून नव्या लेखकांना पुस्तकनिर्मितीचे स्वप्न साकारण्याची संधी मिळत आहे. साहित्यिकांच्या मनातील विचारांना, अनुभवांना आणि






कल्पनाशक्तीला पुस्तकाच्या रूपाने वाचकांच्या हातात पोहोचविण्याचे हे कार्य निश्चितच अभिनंदनीय आहे.

संजय व्यापारी यांच्या कार्याचे सर्वांत सुंदर वैशिष्ट्य म्हणजे साहित्यसेवा आणि समाजसेवा यांचा झालेला मनोहारी संगम. साहित्य हे समाजाच्या संवेदनांना आकार देणारे सामर्थ्य आहे आणि त्या सामर्थ्याला व्यापक वाचकवर्ग मिळवून देणे ही एक प्रकारची अक्षरसेवाच आहे.

‘ज्योतिर्मय साहित्य’चे ध्येय अत्यंत निर्मळ आहे

चांगले साहित्य जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचवणे.

या एका ध्येयाभोवती उभी राहिलेली साहित्यचळवळ आज विस्तारत आहे. मराठी भाषेची गोडी, मराठी साहित्याची समृद्धी आणि नव्या साहित्यिकांच्या प्रतिभेचा सुगंध जगभर पसरविणाऱ्या या अक्षरयात्रेला दिवसेंदिवस नवे वाचक आणि नवे साहित्यिक जोडले जात आहेत.

संजय व्यापारी यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे अनुभवाची शिदोरी, साहित्याची श्रीमंती, कलेची सौंदर्यदृष्टी, पत्रकारितेची धार, संपादकीय प्रगल्भता आणि समाजसेवेची निर्मळ भावना यांचा सुंदर संगम आहे.

त्यांच्या जीवनप्रवासात एक विलक्षण सातत्य दिसतेअक्षरांवर प्रेम, साहित्यिकांवर विश्वास आणि वाचकांवर अपार आस्था. या त्रिसूत्रीने त्यांच्या कार्याला सतत नवी ऊर्जा दिली आहे.

वाढदिवस हा प्रत्येक जीवनप्रवासातील एक मंगल पर्व असतो. या मंगलक्षणी एखाद्या व्यक्तीच्या आजवरच्या कार्याचा गौरव करताना त्याच्या भविष्यातील स्वप्नांसाठीही शुभेच्छांची दीपमाळ प्रज्वलित होते.

संजयजींच्या वाढदिवसानिमित्त मनात एकच सुंदर प्रार्थना उमटते

आपल्या लेखणीला सदैव सर्जनाची पालवी फुटत राहो,

आपल्या विचारांना अक्षरांचे सामर्थ्य लाभत राहो,

आपल्या साहित्यसेवेला नव्या क्षितिजांची चाहूल लागत राहो,

‘ज्योतिर्मय’ची ज्ञानज्योत विश्वभर उजळत राहो,

नव्या साहित्यिकांच्या प्रतिभेला आपल्या कार्यातून नवे आकाश मिळत राहो

आणि मराठी साहित्याचा हा अक्षरदीप असंख्य मनांमध्ये सदैव प्रकाशमान राहो!

संजय व्यापारी म्हणजे एका संपादकाचे नाव एवढ्यापुरते मर्यादित राहणारे व्यक्तिमत्त्व नव्हे; ते साहित्याच्या वारीत सतत चालणारे एक व्रतस्थ पाऊल, नव्या लेखणीला प्रोत्साहन देणारा एक विश्वासू हात आणि अक्षरविश्वाला प्रकाश देणारी एक जिवंत ज्योत आहेत.

त्यांच्या वाढदिवसाच्या या मंगलदिनी त्यांच्या आजवरच्या साहित्यसेवेला मनःपूर्वक अभिवादन!

साहित्याचा सुगंध त्यांच्या जीवनात सदैव दरवळत राहो,

लेखणीची सरस्वती त्यांच्या अंतःकरणात सदैव वास करो,


‘ज्योतिर्मय’चा प्रकाश अधिकाधिक विस्तारत राहो,

आणि त्यांच्या कार्यातून मराठी अक्षरविश्वाची श्रीमंती दिवसेंदिवस वृद्धिंगत होत राहो!

संजयजींना वाढदिवसाच्या अक्षरमंगल, साहित्यसुगंधी आणि मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

माऊली की जय जय श्रीकृष्ण!!!

***



# जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
गोड लागेना भाकर
बांधावरून बघते
करपू लागलं शिवार ||८४२||


अरे बरस पावसा
तुला लागु दे फिकीर
बळीराजा इथं झाला
तुह्यामुळ रे फकीर ||८४३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७२

ज्योतिर्मय साहित्य

समर्थ श्रीरामस्तुती करताना म्हणतात,“ संसारसंगे बहू शीणलों मी, कृपा करी रे रघुराज स्वामी.“ संसार हा आपला महाशत्रू आहे हे लक्षात घेऊन वागणाऱ्याला संसार बाधत नाही. तो संसारात असतो पण साक्षीभावाने प्रपंचाकडे पाहतो. हे सगळे प्रारब्धाचे खेळ आहेत हे तो जाणून असतो. सर्वसामान्यांना तो संसारात रमलेला दिसेलही पण त्याचे चित्त भगवंताकडे असते. आपण बसने किंवा रेल्वेने प्रवास करीत असतो. काहीवेळा सोबत असलेल्या सहप्रवाशांशी आपल्या छान गप्पा होतात. पण आपले स्टेशन आले की आपल्याला उतरावे लागणार हे आपण जाणून असतो. त्यामुळे त्या सहप्रवाशाना सोडून जाताना विशेष दुःख होत नाही. असेच आपण संसारातही असावे. पाण्यात राहूनही चिखलापासून अलिप्त असणाऱ्या कमलदलांप्रमाणे ! हे सगळे सांगणे सोपे पण आचरणे कठीण आहे. पण रामनाम घ्यायला तर सुरुवात करू या. तेव्हा हे मना, अधिक वेळ दवडू नकोस. प्रभात समयापासून भगवंताचे चिंतन कर असेच समर्थ आपल्याला या श्लोकातून सांगू इच्छितात.




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२




स्वसंवाद : १. ज्या ऐहिक सुखांसाठी आणि पैशासाठी मी रात्रं-दिवस देह झिजवतो, ते सुख मला कधी चिरंतन शांतता देऊ शकेल का?

२. नामस्मरणासाठी पैशांचा खर्च नाही आणि देहाला कष्टही नाहीत, तरीही मी ते टाळण्यासाठी वेळेचे किंवा थकव्याचे निमित्त शोधतो का?

३. संसारातील नाती आणि कर्तव्यांमध्ये मी इतका गुरफटलो आहे का, की मला या सगळ्याकडे साक्षीभावाने किंवा अलिप्तपणे पाहता येत नाहीये?

४. पाण्यात राहूनही चिखलापासून अलिप्त राहणाऱ्या कमळाप्रमाणे, मी संसारात राहूनही माझे चित्त भगवंतचरणी ठेवण्याचा प्रयत्न करतो का?

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नामाचे सूक्ष्म स्वरूप

ज्योतिर्मय साहित्य

नुसते ‘राम राम’ म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य ‘नोकरी नोकरी’ असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. ‘रामनाम’ आणि ‘नोकरी’ यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. ‘राम राम’ म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा ‘राम राम’ म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ‘ राम राम ’ म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे ‘नोकरी नोकरी’ असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण ‘राम राम’ म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. ‘राम राम’ म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा ‘नोकरी नोकरी’ म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच ‘राम राम’ म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब ‘राम राम’ म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता‘ राम राम’ जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. ‘मी’ पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

|| अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

# गर्भ उपनिषद

पुढे.....

अथचतुर्थ मासे गुल्फ जठर कटी प्रदेशा भवन्ति/ पंचमे मासे पृष्ठवंशो भवती/ षष्ठे मासे मुख नासिक क्षोत्राणि भवंति/ सप्तमे मासे जीवेन संयुक्त भवती /अष्टमे मासे सर्व लक्षण संपूर्णो भवती/

आधुनिक वैद्यकीय शास्त्राने बालकाची वाढ याच क्रमाने सांगितली आहे.

जन्मणारे बालक ही स्त्री जातीचे किंवा पुरुष जातीचे असेल, हेही उपनिषदे सांगते. त्यात असे दिले आहे की, पित्याच्या शुक्राच्या अधिक्या मुळे पुत्र होतो. मातेच्या रक्ताच्या अधिक्या मुळे कन्या संतती होते. तसेच दोघांच्या बिजाच्या समानते मुळे नपुंसक संतती होते.

व्याकुळ मनाने समागम केल्यामुळे अंध, कुबडी, विकलांग, बुटकी संतती होते. परस्पर वायूच्या संघर्षामुळे शुक्र दोन भागात विभक्त होऊन जुळी संतती होते. गर्भ धारणे नंतर मातेने खाल्लेले प्यायलेले नाळेच्या द्वारे गर्भात पोहोचून प्राण परिपुष्ट होतो त्यानंतर गर्भ नवव्या महिन्यात सर्व लक्षणांनी संपूर्ण होतो. तेव्हा त्यास पहिला जन्मा आठवतो चांगले वाईट शुभ अशुभ कर्म त्याचे समोर येते. म्हणजेच त्यास ते प्राप्त होते. गर्भातील जीव असा विचार करू लागतो की, मी हजारो जन्म पाहिले आहेत. विविध आहार घेतले आहेत. अनेक योनीतील स्तनपान केले आहे. मी वारंवार जन्म आणि मृत्यू भोगले आहेत. (क्रमश:)



# जेवणानंतर कोथिंबीर चावून खाल्ल्याने पचन सुधारते

ज्योतिर्मय साहित्य


विषविकार, नेत्रविकार, पित्तविकार, मूळव्याध, यकृत व पांथरी वाढणे या विकारांत पथ्यकर म्हणून जरूर वापरावी. उपदंश, महारोग, त्वचेचे समस्त विकार यामध्ये दाह, उष्णता कमी करावयास तांदुळजा फार उपयुक्त आहे. नाजूक प्रकृतीच्या व्यक्तीकरिता, बाळंतीण, गरोदर स्त्रिया यांच्यासाठी तांदुळजा वरदान आहे. डोळय़ाच्या विकारात आग होणे, कंड सुटणे, पाणी येणे, डोळे चिकटणे या तक्रारींत तांदुळजाची भाजी खावी. डोळे तेजस्वी होतात. जुनाट मलावरोध विकारात आतडय़ांना चिकटून राहिलेला मळ सुटा व्हायला तांदुळजाची भाजी उपयुक्त आहे. तांदुळजाची पातळ भाजी वृद्ध माणसांच्या आरोग्याकरिता जास्त उपयुक्त आहे. मोठय़ा आतडय़ास जास्त उपयुक्त घटक मिळतात. स्त्रियांच्या धुपणी विकारात तांदुळजाचा रस व तांदुळजाचे धुवण व मध असे मिश्रण फार त्वरित गुण देते. अनेक प्रकारचे विषविकार, चुकीच्या औषधांनी शरीराची आग होत असल्यास तांदुळजाचा रस प्यावा. लघवी स्वच्छ होऊन शरीर निदरेष होते. उंदीर, विंचू, पारा व इतर धातूंच्या विषारात याचा रस प्यावा. शरीराला आवश्यक सर्व घटक तांदुळजा भाजीत आहेत.

पालक : पालक ही अतिशय आरोग्यदायी पालेभाजी आहे. कोवळा पालक औषधी गुणांचा आहे. पालक शिजवताना पाणी थोडेच घ्यावे. पालक भाजीत लोह व काही प्रमाणात नैसर्गिक ताम्र असल्याने पांडू विकारावर अत्यंत उपयुक्त आहे. त्याचबरोबर हाडे बळकट करणारे क्षार पालकभाजीत आहेत. त्याकरिता हाडे ठिसूळ झाली असल्यास पालकभाजी खावी. हाडे जुळून यावी, लवकर ताकद यावी याकरिता शस्त्रकर्म झाल्यावर पालक भाजी किंवा त्याचा रस यांचा मुक्त वापर करावा. पालकाच्या हिरव्या पानात जीवनशक्ती आहे. कृश मुलांना अवश्य द्यावी. दुधाचा पर्याय म्हणून पालक भाजी वापरावी. त्यामुळे त्यांची प्रकृती सुधारून रक्त व अस्थी या दोनही धातूंची वाढ व्हायला मदत होते. पालक भाजीमुळे पोटात होणारा मुरडा थांबतो. वारंवार जुलाब होत असल्यास थांबतात. मात्र पालकभाजी स्वच्छ धुऊन घ्यावयास हवी. फुप्फुसातील दूषित वायू हटविण्यास उपयोगी आहे. काहींच्या मते पालकाच्या भाजीमुळे मूतखडा विरघळून जातो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

पुनर्नवा : पुनर्नवा, घेटोळी, वसू या नावाने ओळखली जाणारी भाजी दर पावसाळ्यात नव्याने येते. याची पालेभाजी कावीळ, उदर, जलोदर, पोट मोठे होणे, लिव्हर सिरॅसिस, पांथरी वाढणे या विकारात फार उपयुक्त आहे. पोटात पाणी झाले असताना अन्न खाल्ले की पोट फुगते. अशा वेळी पुनर्नव्याच्या पानांच्या भाजीत भात शिजवून द्यावा. पाणी होणे थांबते. पोटाची सूज कमी होते. पुनर्नव्याच्या पानांचा व मुळांचा रस काढून प्यावा. लघवी साफ होऊन शरीराची सूज ओसरते. पुनर्नव्याच्या पाल्याच्या रसाने रक्त वाढते.

माठ : माठ ही सदासर्वदा उपलब्ध असणारी पालेभाजी रानोमाळ आपोआपही उगवते व त्याची बागायती शेतीही केली जाते. रानोमाळचा माठ बहुधा काटेरी असतो. एरवी तांबडा व पांढऱ्या रंगाचा माठ मिळतो. माठाची पालेभाजी ही पथ्यकर, वजन वाढवायला व अम्लपित्त विकारांत विशेष उपयोगी आहे. **(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



✍ हिंमत

हिंमत ही आपली वैचारिक शक्ती आहे, प्रत्येक कार्य सफल होण्यासाठी हिची नितांत आवश्यकता असते, अतिशय अवघड गोष्ट सुद्धा हिंमतीने आपण पूर्ण करू शकतो.




✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### एक अनुपम संघर्ष कथा

मित्रांनो आणि वाचकहो, संघर्ष संकटे व अडचणी या सर्वांच्याच जीवनात येतात, त्यावर मात करत, मार्ग काढत पुढे जावेच लागते! सुखाची गोडी दुःखातून येते. अशीच एक कथा माझ्या वाचनात आली, ती तुमच्यासाठी शेअर करत आहे.सर्व क्षेत्रातील दिग्गज कलाकार असो वा ईतर त्यांनाही कष्ट, जिद्द व महत्वाकांक्षाच पुढे नेते. मित्रांनो, अपयशातूनही आपला आत्मा ऊन्नत होतो अशा एका अभिनय विश्वातील, बालीवूड क्षेत्रात असलेल्या दिग्गज स्टार कलाकाराची कथा सांगतो.

प्रथम "अनुपम" का तर अनुपम हा शब्द सर्वोत्तम, सर्वांगसुदर, गुणसंगमाचा अनोखा मिलाप.. जसे अनुपम सौदर्य अनुपम कथा, अनुपम कार्य म्हणजे ज्याला ऊपमा देता येत नाहीअसे. आणि आजच्या आपल्या कथेत नावानेही तो' अनुपम' आहे. असा नायक ते खलनायक, आवाजाचा सुदंर अदाकारीचा अभिनेता नट म्हणजे अनुपम खेर होय. 555 चित्रपट करणारा, अनेक कठीण परिक्षाना सामोरे गेलेला, वयाच्या फक्त 28व्या वर्षी 60 वर्षाच्या वृद्धाची भूमिका करणारा, अवघे 37 रूपये घेऊन मुंबईला आलेला, गंभीर ते विनोदी व अभिनयाच्या अनेक प्रकारे सेवा देणारा, फिल्मफेअर, पद्मपुरस्काराने सन्मानित आणि 2008 पासून "अनुपम खेर फाऊंडेशन या संस्थेद्वारे गरिब मुलांना मदत करणारा हा अभिनेता अनेक राष्ट्रीय पुरस्कार,विदेशातील पुरस्कार सन्मान त्याच्या नावे आहेत. तर मित्रांनो कशी वाटली ही अनुपम कथा. ईथंच थांबतो. आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे. सुप्रभात.

# प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### मैफील गप्पांची



खूप दिवसांनी होता
बालपणीच्या मैत्रीणींची भेट
रंगते मैफील गप्पांची
सुंदर त्या आठवणींना
मिळतो पहा उजाळा
वर्षा होते आनंदाची

जेवनानंतर नेहमीच पहा
घरोघरी रंगत असते
सुंदर मैफील गप्पांची
एकत्रीत येता सर्वजण
आनंद होतो मनी
दृष्ट नको कोणाची

# कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी विलास कोरडे, तर कार्याध्यक्षपदी अविराज कोरडे !

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - शहर व परिसरात आपल्या नाविन्यपूर्ण आणि सामाजिक उपक्रमांसाठी प्रसिद्ध असलेल्या कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळाचे यंदा १७ वे वर्ष असून, या वर्षाच्या नूतन कार्यकारिणीची नुकतीच अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.


पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या कुलस्वामिनी प्रतिष्ठानने आतापर्यंत विविध जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकावून आपल्या उपक्रमांची मोहर उमटवली आहे. यावर्षी देखील मंडळाच्या वतीने अत्यंत भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक देखावा साकारण्यात येत आहे. ''५० फुटी झाडामध्ये ४१ फुटी गणेश मूर्ती प्रगटणार'' असा नयनरम्य व निसर्गप्रेमाचा संदेश देणारा पर्यावरणपूरक देखावा यंदाचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

मंडळाची २०२६-२७ ची नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे:

अध्यक्ष: विलास कोरडे, कार्याध्यक्ष: अविराज कोरडे, सचिव: सौ. अलका कोरडे, उपाध्यक्ष: संजय राठोड, कोषाध्यक्ष: सौ. लता अनिल गावंडे, कार्यकारिणी सदस्य: सौ. सविता अचूत कुलकर्णी, प्रल्हाद गायकवाड, ज्ञानेश्वर सागरे, नथुराम नरवाडे, मजहर मंडीवाला, सचिन जोहरे. यंदाचा हा अनोखा देखावा पाहण्यासाठी शहरातील व परिसरातील सर्व गणेशभक्तांनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आले.



# शास्त्रज्ञ डॉ.प्रकाश हलामी यांनी दिली नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालयाला भेट

**ज्योतिर्मय साहित्य**

कुरखेडा - साय- ₹क ग्लोबल रजिस्ट्री -२०२५ मध्ये जगातील उत्कृष्ट पाच टक्के शास्त्रज्ञांमध्ये निवड झालेले व मानाचे स्थान मिळविणारे गडचिरोली जिल्ह्यातील पहिले संशोधक ठरलेले मूळ गाव खरमतटोला येतील शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश हलामी सध्या मूळ गावी आले असताना अनेकांच्या भेटीगाठी घेत देऊळगाव येतील शासन मान्यता असलेल्या नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालयाला भेट दिली. वाचनालयाच्या वतीने डॉ. हलामी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सोबतच साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल यांनी आपला स्वलिखित असलेला संशोधन ग्रंथ ''रानभाज्यांच्या जगात'' व झाडीचा खाजा'' काव्यसंग्रह त्यांना भेट म्हणून दिला. त्यावेळी बोलताना डॉ.हलामी म्हणाले की, शोशल मीडियाच्या जमान्यात आजकाल वाचन संस्कृती लोप पावत आहे. पण,आज या छोट्याशा खेडेगावात व वाचनसंस्कृतीचे महत्व जाणून गावाच्या विकासासाठी सार्वजनिक वाचनालय खोलून गावासाठी खूप मोठे योगदान दिले आहेत. बघून फार आनंद झाला. सोबतच संगीता ठलाल यांचा ''रानभाज्यांच्या जगात'' संशोधन ग्रंथावर बोलताना म्हणाले हा नुसता ग्रंथ नसून सर्वच क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी फार मोठा आधार आहे. आजकाल खाद्यसंस्कृती तसेच अस्सल रानभाज्या नष्ट होत आहेत, त्यांचे संशोधन करून एक सामान्य शेतकरी, गृहीणी असताना सुद्धा संगीता ठलाल यांनी हा जिवन उपयोगी असलेला ग्रंथ काढून समाजासाठी मोलाचे योगदान दिले आहेत.

याचा प्रसार आणि प्रचार नुसते देशातच नाही तर जगात सुद्धा झाला पाहिजे अनेकांनी यासाठी पुढाकार घेऊन सर्वांपर्यंत हा ग्रंथ पोहोचविणे गरजेचे आहे.आज या छोट्याशा गावात सार्वजनिक वाचनालयाची सोय दिसते तसेच एक साहित्यिक व अभ्यासक घडलेला बघून अभिमान वाटतो. नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने माझा सन्मान केला व संगीता ठलाल यांनी आपले दोन पुस्तके भेट म्हणून दिली त्याबद्दल वाचनालयाचे, सर्वच पदाधिकाऱ्यांचे,त्यांच्या कुटुंबाचे आभार मानले. त्यावेळी गावातील प्रथम नागरिक सरपंच विजय तुलावी, वाचनालयाच्या सदस्या निर्मला ठलाल, राकेश खुणे, पुर्णा ठलाल, अनिल खुणे, श्रावण ठलाल प्रामुख्याने उपस्थित होते. शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश हलामी यांनी वाचनालयाला भेट दिली व आपल्या अनुभवातून मोलाचे विचार व्यक्त केल्याबद्दल साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी त्यांचे आभार मानले.

# पर्यावरण पूरक शाडू मातीच्या मूर्तींच्या कार्यशाळेस चांगला प्रतिसाद

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने विघ्नहर्ता गणेश मंदिर एन ३, सिडको तसेच आनंद विद्या मंदिर व एमआयटी शाळा एन -४ सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने शाडू मातीच्या गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवलेला होता.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रशिक्षकांसह सर्वच मान्यवरांचा शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

शाडू मातीच्या मूर्ती बनवण्याच्या कार्यशाळेत प्रत्येक विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने अत्यंत सुबक सुंदर गणेश गणेशमूर्ती साकारल्या. अशा भावपूर्ण




गणेशमूर्ती पाहून विद्यार्थ्यां बरोबर कांहीं शिक्षकांनी उत्साहात सुंदर मूर्ती साकारल्या. सहभागी विद्यार्थ्यांनी बालगणेश, जयमल्हार गणेश, मोदक प्रिय गणेश, बोधिवृक्ष गणेश, अशा विविध आशयांच्या गणेश मूर्ती साकारलेल्या पाहून प्रशिक्षक सुधीर कोर्टीकर व सुवर्णा शेळकेही भारावून गेल्या.

गणेशोत्सवाच्या पारंपारिक उत्सवा बरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा उद्देश या उपक्रमामधे होता. शाडूच्या मातीच्या मूर्ती तयार करण्याची प्रत्यक्ष कृती विद्यार्थ्यांनी केल्यामुळे त्यांना पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचे महत्व अधिक समजले नी घरां घरांतून हा संदेश पोहोचला गेला. शाडू मातीच्या गणेश मूर्तींच्या कार्यशाळे साठी प्रशिक्षक म्हणून ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर आणि महिला प्रशिक्षक म्हणून सुवर्णा शेळके यांनी विद्यार्थ्यांना गणेश मूर्ती कशा करायच्या याचे सुंदर प्रशिक्षण देतानां स्वतःही एक सुरेख गणेश मूर्ती बनवून दाखवली. कार्यक्रमाचे आयोजन उदय देशपांडे युवक उद्योजक, प्रतीक शिरसे, शाळेचे वानखेडे सर, गणेश मालोदे सर, मुसळे सर, अनिल घुगे सर, वनिता तिवसकर ताई आणि ओम लहाने यांच्यासह अनेक शिक्षकांचा सहभाग होता. विद्यार्थी व कार्यकर्ते कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विग्घहर्ता गणेश मंदिराचे विश्वस्त अनिल भालेराव , व्ही. जी.कुलकर्णी, गजानन देशमुख यांच्या अनमोल मदतीमुळे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# उन्नती सोशल फाउंडेशनच्या पर्यावरणपूरक गणेशमुर्ती कार्यशाळेत रमले बाल मुर्तीकार

**ज्योतिर्मय साहित्य**


पुणे - श्री गणेश उत्सवाच्या आगमना प्रित्यर्थ येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने लहान मुलांसाठी घेण्यात आलेल्या पर्यावरणपूरक गणेशमुर्ती कार्यशाळेत लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शनिवार दि. १२ रोजी सकाळी उन्नती कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यशाळेत सहभागी मुलांना शाडूची माती देऊन त्यापासून तयार करण्यात येणाऱ्या गणेश मुर्तीचे प्रशिक्षण देण्यात आले. जवळपास अडीचशे मुलामुलींनी या कार्यशाळेत छोट्या आकारातील विविध गणेशमुर्ती तयार करुन मुर्तीकलेचे अनोखे दर्शन घडविले. या उपक्रमासाठी वैष्णवी शेगावकर आणि सुधीर लांडगे यांचे मुलांना विशेष मार्गदर्शन लाभले. सदरील



कार्यशाळेचे आयोजक उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे , पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभागातील नगरसेविका डॉ. कुंदा भिसे तसेच उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे सचिव सखाराम ढाकणे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अशोक वारकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. लहान मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यादृष्टीने गेल्या आठ वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येत असून दरवर्षी याला लहान मुलांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे संजय भिसे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन बाळकृष्ण चौधरी यांनी केले. गणेशाच्या पारंपरिक आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.









## अभावातून प्रभावाकडे...



अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495

### विचारांच्या पलीकडे-साक्षीच्या प्रकाशात वर्तमान

पुढे......

स्मृती जागी होते—म्हणून “माझ्याबरोबर हे घडले.”

परंतु वेदान्त एक अत्यंत सूक्ष्म प्रश्न विचारतो—

जे मला दिसते, ते ‘मी’ कसे असू शकते?

शरीर मला जाणवते.मनातील विचार मला कळतात.

भावना मला जाणवतात.स्मृती मला आठवतात.

म्हणजेच—ही सर्व दृश्ये आहेत आणि त्यांना जाणणारा कोणी तरी वेगळा आहे. याच जाणणाऱ्याला वेदान्त द्रष्टा, साक्षी, आत्मा, चैतन्य अशा नावांनी निर्देशित करतो.

१. शरीर बदलते, पण “मी” असल्याची जाणीव टिकते

बालपण गेले. तारुण्य गेले. शरीर बदलले. विचार बदलले. आवडी बदलल्या. संबंध बदलले. जीवनातील परिस्थिती बदलल्या. पण एक जाणीव मात्र अखंड राहिली—“मी आहे.”

म्हणूनच कठोपनिषद् सांगते—

न जायते म्रियते वा विपश्चित्
नायं कुतश्चिन्न बभूव कश्चित् ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥
— कठोपनिषद् १.२.१८

आत्मा जन्मत नाही, मरत नाही; शरीर बदलले तरी आत्मस्वरूपाला नाश नाही.आपण आयुष्यभर बदलणाऱ्या गोष्टींमध्ये अपरिवर्तनीय ‘मी’ शोधत असतो.

पण वेदान्त सांगतो—

जे बदलते ते दृश्य; जे बदलताना पाहते ते द्रष्टा.

२. मन विचार करते; पण विचारांना जाणणारा कोण?

भगवद्गीतेत भगवान म्हणतात—

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥
— भगवद्गीता २.१४

शीत-उष्ण, सुख-दुःख यांसारखे अनुभव येतात आणि जातात; ते अनित्य आहेत. आज मन दुःखी आहे.उद्या प्रसन्न आहे.कधी उत्साह आहे.

कधी निराशा आहे.जर “मी दुःखी” हीच अंतिम सत्यता असती, तर दुःख गेल्यावर “मी”ही गेले असते.पण तसे होत नाही.दुःख आले—आपल्याला कळले.दुःख गेले—हेही आपल्याला कळले. (क्रमशः)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'बहीण-भाऊ' (अतूट विश्वासाचा रेशीमबंध)

"चिंधी बांधते द्रौपदी हरीच्या बोटाला..."

किंवा

"भरजरी ग पितांबर दिला फाडून,
द्रौपदीसी बंधू शोभे नारायण..."

इतिहासातील अशीच एक प्रसिद्ध आख्यायिका सांगितली जाते—चित्तोडगडवर जेव्हा संकट ओढवले, तेव्हा मेवाडची राणी कर्णावती हिने मुघल बादशहा हुमायूनला राखी पाठवून मदतीची साद घातली होती. हुमायूननेही त्या राखीचा आणि मानलेल्या बहिणीच्या हाकेचा पूर्ण मान राखून तिच्या रक्षणासाठी तातडीने सैन्य घेऊन धाव घेतली होती. जाती-धर्माच्या आणि रक्ताच्या सीमा ओलांडून केवळ एका पवित्र धाग्याने निर्माण केलेले हे विश्वासाचे नाते जगाच्या इतिहासात अजरामर झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनीही रयतेतील प्रत्येक माऊलीला बहिणीचा सन्मान देऊन या नात्याचे पावित्र्य अखंड जपले. हेच बहीण-भावाचे पवित्र नाते भारतीय मनामनात जर कायमस्वरूपी जागृत राहिले, तर आपल्या भगिनींवर होणारे अन्याय आणि अत्याचार कायमचे संपुष्टात आल्याशिवाय राहणार नाहीत! आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात बहीण-भावाच्या प्रत्यक्ष भेटीगाठी कदाचित थोड्या कमी झाल्या असतील; पण मनातील ओलावा कधीच कमी होत नाही. नात्यांच्या या भरजरी 'महावस्त्रा'चा हा बहीण-भावाचा पदर अथांग प्रेम, निस्वार्थ माया आणि विश्वासाची ऊब देतो. हा पदर जेवढ्या आदराने जपला जाईल, तेवढं आपलं आयुष्य अधिक सुंदर, सुसंस्कारी आणि समृद्ध राहील!

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### प्रत्येक दिवस ही नव्याने सुरुवात करण्याची संधी आहे

काही रात्री अशा असतात...

ज्या रात्री माणूस झोपत नाही. फक्त डोळे मिटून पडून राहतो. उशीवर डोकं असतं... पण मन भूतकाळात हरवलेलं असतं.

एखाद्याचा चेहरा आठवत असतो...

एखादा कठोर शब्द कानात घुमत असतो...

एखादी चूक मनाला टोचत असते... एखादं स्वप्न तुटल्याची वेदना छातीत दाटून आलेली असते.

आणि नकळत डोळ्यांतून अश्रू उशीवर पडतात.

त्या क्षणी माणूस स्वतःलाच विचारतो—

"आता पुढे काय?"

"मी इतका तुटलो आहे... पुन्हा कसा उभा राहू?"

कधी कधी उत्तर मिळत नाही.

पण... सकाळ होते.

खिडकीतून प्रकाश आत येतो.

पक्ष्यांचा आवाज येतो. बाहेरचं जग पुन्हा धावायला लागतं. आणि आयुष्य...

काहीही न बोलता आपल्या हातात आणखी एक दिवस ठेवतं. जणू काही म्हणतं—'घे... अजून एक संधी. काल जे जमलं नाही, ते आज पुन्हा प्रयत्न करून पाहा.' खरं तर प्रत्येक सकाळ हा देवाचा सर्वांत सुंदर संदेश असतो.

"तुझं आयुष्य अजून संपलेलं नाही."

पण विचार करा... कालचा दिवस तुमच्या आयुष्यातून निघून गेला आहे. मग त्याला आजच्या दिवसावर राज्य करण्याचा अधिकार का द्यायचा?

आपल्याकडे एकच संधी नसते. जोपर्यंत आपण श्वास घेतो, तोपर्यंत आयुष्य आपल्याला पुन्हा सुरुवात करण्याची संधी देत असतं.

कधी कधी नव्याने सुरुवात म्हणजे मोठं काही करणं नसतं. कधी नव्याने सुरुवात म्हणजे...

रागावलेल्या व्यक्तीला फोन करणं.

"मला माफ कर" म्हणणं. खूप दिवसांपासून बंद पडलेलं स्वप्न पुन्हा उचलणं. आरशात स्वतःकडे पाहून पुन्हा हसणं. आई-वडिलांना मिठी मारणं.

स्वतःला दोष देणं थांबवणं. किंवा...

फक्त पुन्हा उठणं.

हो... कधी कधी सकाळी अंथरुणातून उठणंही एक मोठा विजय असतो.

कारण काही माणसं रात्री इतकी तुटलेली असतात की सकाळी जगण्याची इच्छाही कमी झालेली असते.

पण तरीही ते उठतात. चेहरा धुतात. डोळ्यातील अश्रू पुसतात. आणि पुन्हा जगासमोर उभे राहतात. हेच खरे योद्धे असतात.

नव्याने सुरुवात करण्यासाठी तुम्हाला परिपूर्ण असण्याची गरज नाही.

तुमच्याकडे सगळं असण्याची गरज नाही.

(क्रमशः)

## दवाखाना

# कॉलरा (४)


ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो!

नमस्कार मैत्रांनो!

मागील भागात आपण जाणून घेतले की कॉलरावर निर्जलीकरणाचा उपचार म्हणून सर्वदूर उपलब्ध असलेले क्षारयुक्त ओ.आर.एस तोंडावाटे दिल्या जाते. रुग्णाला सतत उलट्या होत असतील आणि निर्जलीकरण अतिशय तीव्र असेल तर ते शक्य होत नाही. इथे रुग्णाला दवाखान्यात भर्ती करून क्षारयुक्त जल नसेवाटे देणे आवश्यक असते. तीव्र निर्जलीकरण झालेल्या गंभीर कॉलरावर उपचार करण्यासाठी 'रिंगर्स लॅक्टेट सोल्युशन' हे सर्वोत्तम आणि मानक असे इंट्राव्हेनस द्रव आहे. यामुळे रुग्णाच्या शरीरात पुनर्जलीकरण होण्याची प्रक्रिया वेगाने सुरु होते. रिंगर्स लॅक्टेट रुग्णाच्या शरीरात इलेक्ट्रोलाइट संतुलन पुनर्स्थापित करते, कारण या द्रवातील क्षार आणि खनिजांचे मिश्रण रुग्णाच्या शरीरातून तीव्रपणे पाण्यासारख्या जुलाबामुळे शरीरातून बाहेर पडणाऱ्या घटकांशी इतर द्रवांच्या तुलनेत सर्वाधिक जुळते. याशिवाय या द्रवातील सोडियम लॅक्टेटचे यकृताद्वारे बायकार्बोनेटमध्ये चयापचय होते. ते रक्तातील अतिरिक्त आम्ल निष्प्रभ करते आणि कॉलरामुळे होणारी चयापचयजन्य आम्लता (मेटाबोलिक असिडोसिस) कमी होते. रक्तातील क्षार आणि सामू (पी एच-आम्लतेचा परिचायक) तसेच साखर इत्यादींच्या तपासण्या करण्यात येतात, त्यांच्या अहवालानुसार आणि रुग्णाच्या उलट्या कमी झाल्यावर रिंगर्स लॅक्टेट इंट्राव्हेनस द्रव थांबवून तोंडावाटे ओ.आर.एस. सुरु करण्यात येते.

मंडळी, हे रिंगर्स लॅक्टेट सोल्युशन दवाखान्यात सतत उपलब्ध असायलाच हवे. या आणि अशा प्रकारच्या औषधांना जीवनरक्षक औषधे असे म्हटले जाते. या जीवनरक्षक औषधांची यादी रुग्णालयातील वरिष्ठ तज्ज्ञ डॉक्टर यांच्या सल्ल्यानुसार बनवली जाते. यात फार्माकोलॉजी विभागातील तज्ज्ञांचा सहभाग महत्वाचा असतो. फार्माकोलॉजी विभागाशी संबंधित अशा औषधी भांडाराचे व्यवस्थापन करण्यात मी बरीच वर्षे कार्यरत होते. सरकारी रुग्णालयात औषधे उपलब्ध नसतात अशा बऱ्याच ठळक बातम्या झळकत असत. (त्याविषयी नंतर कधीतरी!) औषधांच्या उपलब्धतेशी अत्यंत निकटचा संबंध असलेल्या दवाखान्यातील औषधांच्या साठ्याचे नियोजन करतांना कुठली औषधे, कुठल्या डोजमध्ये आणि




किती प्रमाणात साठवणूक करून ठेवावी, याविषयीची प्रस्थापित यादी जागतिक आरोग्य संघटनेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते. दर पाच वर्षांनी याची सुधारित आवृत्ती प्रकाशित होते. आवश्यक असल्यास मधल्या काळात एखादे खूप चांगले औषध उपलब्ध झाले (उदा -कॅन्सर, एड्स) तर ते या यादीत जोडण्यात येते. तसेच यादीतील एखाद्या औषधाचे भयंकर दुष्परिणाम आढळून आले तर ते औषध तात्काळ या यादीतून हटवले जाते. मैत्रांनो, औषधशास्त्राचे हे प्रवाही रूपच मला अतिशय भावते.

एखादी गृहिणी जेव्हा स्वयंपाकास आवश्यक अशा वस्तूंची यादी करते तेव्हा तिला सर्वप्रथम रामरसाची अर्थात मिठाची आठवण येते, त्यानंतर मिरची आणि तत्सम मसाले! पैशांची तंगी असेल तर केशर, काजू आणि बदामासारखे महाग जिन्नस वगळल्या जातात. तद्वतच औषधांच्या आवश्यकतेच्या दृष्टिकोनातून रुग्णालयात लागणाऱ्या औषधांची यादी अर्थात, ड्रग इन्व्हेंटरी रुग्णालयातील तज्ज्ञ मंडळी (यात फार्माकोलॉजीतील तज्ज्ञाला पर्याय नाही) ठरवतात. इथे प्रामुख्याने रुग्ण-निदान आणि सरकारी स्तरावर उपलब्ध होणारा निधी विचारात घेतल्या जातो. 'ड्रग इन्व्हेंटरी मॅनेजमेंट'मध्ये सामान्यतः तीन प्रकार असतात- व्ही- व्हायटल, इ-इसेन्शिअल आणि डी- डिझायरेबल असे विश्लेषण केल्या जाते. या विश्लेषणाचा मूलभूत आधार रुग्णाचे जीवन आहे.

✻अति-अत्यावश्यक अर्थात जीवनरक्षक औषधे (व्ही): (उदा. आताच चर्चिलेले रिंगर्स लॅक्टेट द्रव). ही औषधे रुग्णालयात २४७ काळाकरता म्हणजेच सतत उपलब्ध असावीत, कारण ती गंभीर आजार, आपत्कालीन परिस्थिती किंवा प्राणघातक प्रसंगी (उदा. हृदयविकार, विषबाधा, गंभीर संसर्ग किंवा अपघात) रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी अत्यावश्यक असतात.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

✻अत्यावश्यक/अतिशय महत्वपूर्ण औषधे (इ): (उदा. पॅरासिटामोल गोळ्या) ही औषधे नेहमी उपलब्ध असावीत, नसल्यास २४ तासांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावीत. दवाखान्यात येणाऱ्या बहुसंख्य रुग्णांकरिता ही औषधे आवश्यक असतात.

✻इष्ट औषधे (डी): (उदा. दुय्यम औषधे, मल्टीव्हिटॅमिन!) ही औषधे कांही दिवसांकरता नसली तरी रुग्णालयाचे काम भागते. ती उपयुक्त असू शकतील पण नसली तरी रुग्णसेवेत व्यत्यय येत नाही. आवश्यक निधी नसल्यास यांच्या मागणीस कात्री लावता येते.

महत्वाचा नियम असा की ड्रग इन्व्हेंटरीत प्रस्थापित औषधांचा समावेश करणे केव्हाही हितकर असते, कारण त्यांचे डोज, संभावित परिणाम आणि दुष्परिणाम ज्ञात असतात. याउलट जेव्हा मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह एखाद्या नवीन औषधाची शिफारस करतो, तेव्हा चिकीत्सक मंडळींनी त्या औषधाविषयी परिपूर्ण माहिती असल्याशिवाय दवाखान्यातील औषधांच्या यादीत त्याचा समावेश करण्यासाठी आग्रह करू नये. ही ड्रग इन्व्हेंटरी प्रत्येक दवाखान्यासाठी स्थानिक पातळीवर तयार करायला हवी. एखाद्या ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्राची यादी शहरातल्या मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटलपेक्षा निश्चितच लहान असेल.

औषधाची किंमत अधिक म्हणजे ते अधिक प्रभावी असे अजिबात नाही. सध्या फिरणाऱ्या एका व्हाट्सअप ऍडवरून आपल्या सर्वांना रुचेल असे एक उदाहरण आठवले. आपला लाडका गणराया त्याला एखाद्या गरीब भक्ताने मनोभावे अर्पण केलेला लाल गव्हाच्या मोदकाचा नैवेद्य गोड मानून घेतो. पण श्रीमंत भक्त मंडळींसाठी सोन्याचा वर्ख आणि एक नंबर सुका मेवा असलेला लाखांच्या घरात असलेला मोदक सध्या उपलब्ध आहे. याने गणपतीबाप्पा त्यांना स्पेशल कृपाप्रसाद बहाल करतात की नाही हे माहित नाही, पण ज्याला कुणाला हा लाखमोलाचा मोदक दिल्या-घेतल्या जातो त्याची हौस आणि बरेच काही भागत असावे हे नक्की.

मंडळी, खाद्यपदार्थ असो वा औषधे, स्थानिक गरज आणि स्थानिक उपलब्धता यांचा मेळ अत्यावश्यक आहे. इथे इंपोर्टेड माल कशाला हवा? रिंगर्स लॅक्टेटवरून सुरु झालेले हे प्रकरण आता आटोपते घेते. गणपतीबाप्पा मोरया!

✻✻✻

# उकडीचे मोदक :उकडीचे मोदक -अचूक प्रमाणासह सोपी रेसिपी

ज्योतिर्मय साहित्य

गणेश जयंतीसाठी आता साऱ्यांची लगबग सुरु झाली आहे. सार्वजनिक ठिकाणी मंडप घालून,व्यवस्था करणे सुरु झाले आहे, तर महिलांची तऱ्हेतऱ्हेचे मोदक बनवण्यासाठी सुरुवात झाली आहे. बाजारात अनेक मिठायांच्या दुकानात तर मोदकांसाठी झुंबड पडते.असंख्य प्रकारचे मोदक मिळतातही. पण उकडीचे मोदक गरम गरम .. पांढरेशुभ्र मोदक ..त्यावर साजूक तुपाची धार सोडून खाण्यात एक आगळेच स्वर्गसुखच असते . आपण हे सुंदर मोदक घरी सुद्धा बनवू शकतो .

गणपती बाप्पांच्या नैवेद्यासाठी त्यांच्या आवडीचे खास पांढरेशुभ्र मोदक आताआपण घरीच बनवू या आणि भरपुर बनवुन मनसोक्त ताव मारुया . हे मोदक खाऊन बाप्पापण नक्कीच खुश होणार आणि भरभरून आशीर्वाद देणार. चला, लागायचे मग तयारीला ?

साहित्य:

सारणासाठी..

१ वाटी गच्च दाबून भरून मोठी वाटी नारळाचा चव, अर्धी वाटी बारीक केलेला गुळ, १ चमचा खसखस, १ चमचा वेलची पावडर,१ चमचा साजूक तूप.

पारी साठी साहित्य :

१ वाटी बासमती तांदुळाची पिठी,१ चमचा मैदा, पाव वाटी वरून लावण्यासाठी तांदुळाची पिठी, चवीनुसार पारीसाठी थोडेसे मिठ,३..४ चमचे साजूक तूप, १ वाटी पाणी , केशरांच्या काड्या, वरून खाण्यासाठी साजूक तूप.

कृती :

सारण बनवण्याची :

१ नारळ फोडून कुकर मध्ये १ शिट्टी देऊन कोमट झाला की सुरीने झटपट सुटतो . मग त्याची साल काढण्याने साल काढून बारीक तुकडे करून मिक्सर मधून बारीक फिरवून घ्यावेत .

गॅसवर कढई ठेवून ती गरम



झाली की आधी खसखस थोडीशी भाजून घ्यावी व किंचित ठेचावी म्हणजे तिचा स्वाद खूप मस्त येतो. नंतर त्याच कढई मध्ये १ चमचा तूप घालून त्यात नारळाचा चव थोडासा ओलसरपणा जाईपर्यंत परतावा. तसे नारळाचे पण तेल असते पण ते सुटेपर्यंत परतायचे नाही शिवाय तुपामुळे सारणाला खुप सुरेख स्वाद येतो. आता त्यात गुळ घालावा. मग वेलची पावडर घालावी. गुळ पूर्ण विरघळेपर्यंत व्यवस्थित परतावे आणि मग गॅस बंद करावा . सारण खूप ओलसरही नसावे आणि अगदी कोरडेही नसावे. चुकून जास्त कोरडे झाले तर चिंता न करता मिक्सर मधून थोडेसे फिरवावे म्हणजे मोकळे होईल आणीखूप मोकळे झालेअसेल तर अगदी किंचित दूध घालावे. म्हणजे सारण ओलसर होईल . व मोदक छान लागतात.

आता हे सारण थंड होऊ द्यावे .तोपर्यंत पारीची तयारी करू.

पारीची कृती :

गॅसवर एका जाड बुडाच्या भांड्यात १ वाटी पाणी उकळायला ठेवू . मग त्यात १ चमचा तूप घालून ते वितळले की, चवीसाठी पाव ते अर्धा चमचा मिठ घालावे नंतर त्यात १ वाटी तांदुळाची पिठी व मैदा घालावा व लाकडाच्या दांड्याने किंवा लाटणेरवी यांनी भराभर घोटून व्यवस्थित मिक्स करावे व लगेंच झाकण ठेवून गॅस बंद करावा. १० मिनिटे तसेच ठेवावे. त्यानंतर ते पसरट थाळीकिंवा तसराळ्यात काढून घेऊन असेल तर पोळी भाजण्याच्या दाबण्याने किंवा ग्लास ,वाटी यांनी छान दाबून घोटावे म्हणजे छान नरम होईल. मग ते चिकटू नये म्हणून १..२ चमचे तूप घालून लागेल तसे थोडेसे पाणी लावत भरपूर घोटावे. जेवढे जास्त मळले ..घोटले जाईल तेवढी पारी पातळ, न तुटणारी, आणि तुपामुळे एकदम सॉफ्ट व मुलायम होते. मग त्याचा एक छोटा गोळा




करून पारीसारखा बनवून पहावा. तो चिकट न होता सॉफ्ट आणि चिरा न पडणारी पारी बनली तर ते परफेक्ट झाले असे समजावे. मग त्याचे टेनिसच्या बॉलपेक्षा थोडेसे छोटे बॉल्स बनवून ते पोळपाटावर थोडी तांदुळाची पिठी लावून छान पातळ पारी बनवावी. मैदा घातल्यामुळे पारी पातळ होते आणि तुटत सुद्धा नाही. आणि तुपामुळे चमकदार मोदक सुरेख दिसतात आणी स्वाद सुद्धा खूप मस्त येतो.

मग त्या पारीमध्ये थंड झालेले सारण भरपूर भरावे. मग साडीच्या निर्यांप्रमाणे वरपासून जास्तीतजास्त खालीपर्यंत कळ्या पाडून वरती हलक्या हाताने सर्व टोके एकत्र करून व्यवस्थित बंद करून मस्त टोक काढावे. प्रत्येक मोदकावर एकेक केशराची काडी ठेवावी. अशाप्रकारे सर्व मोदक बनवून घ्यावेत.

मग गॅसवर मोदकपात्र ठेवून त्यात पाणी उकळण्यास ठेवावे. मोदकपात्रातील जाळीच्या डिशमध्ये थोडेसे तूप लावून त्यावर सर्व मोदक ठेवावेत. पाणी छान उकळायला लागले की त्यात ही डिश ठेवून पंधरा मिनिटे दणकून वाफ द्यावी . आता मोदकांचा रंग छान वाफल्यामुळे चमकदार, पांढराशुभ्र झालेला असेल. वरच्या केशरकाड्यान्चा छान केशरी रंग टोकाला दिसत असेल. हे मोदक पात्रातून सर्व्हिंग डिश मध्ये काढून गरम गरम मोदक थोडासा फोडून त्यावर भरपूर साजूक तूप घालून घावे. व गरगरमच खायला द्यावेत. गुळामुळे खूप मस्त खमंग गोडाची चव येते.

वैशिष्टय:

हे मोदक या पद्धतीने बनवले तर खात्रीने सुरेखच होतात. रंग, स्वाद, चव सर्वच उत्तम जमते. मिठामुळे पारीला छान चव येते. वेलची पावडर, केशर, गुळ , तूप आणि खसखस यांच्या सुरेख संगमामुळे आणि एकदम पातळ ,एकदम पांढरीशुभ्र,किंचित नमकीन पारी यामुळे हा मोदक खाणे म्हणजे स्वर्गसुखच! गणपती बाप्पा तर नक्कीच खूप होणार.

या साहित्यात साधारण १० ते १२ मोदक बनतात.

✻✻✻



## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण (भाग-७)

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्कः ८३०८८३५३१३

### पुराणातील विश्वकल्पना आणि आधुनिक खगोलशास्त्र एक तुलनात्मक दृष्टिकोन

पूर्वार्ध:

विष्णुपुराणातील विश्वरचना आणि आधुनिक खगोलशास्त्र यांची तुलना करताना सर्वप्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की दोन्हींचे उद्दिष्ट, पद्धती आणि ज्ञानमीमांसा वेगवेगळी आहे. पुराणे एका धार्मिक-सांस्कृतिक विश्वदृष्टीतून विश्वाचे वर्णन करतात, तर आधुनिक खगोलशास्त्र निरीक्षण, गणित आणि भौतिकशास्त्रीय सिद्धान्तांवर आधारलेले आहे. तरीही दोन्हींची तुलना केल्याने प्राचीन भारतीयांच्या विश्वविषयक विचारांचे स्वरूप अधिक स्पष्ट होऊ शकते.

१. पृथ्वीचे स्थान

पुराणपरंपरेतील विश्वरचनेत पृथ्वीला विश्वाच्या मध्यवर्ती रचनेतील महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते. तिच्या वर सूर्य, चंद्र, नक्षत्रे आणि ग्रहांचे विविध स्तर मांडले जातात. आधुनिक खगोलशास्त्रात मात्र पृथ्वी ही सूर्याभोवती फिरणाऱ्या ग्रहांपैकी एक आहे. सूर्य स्वतःही आकाशगंगेतील अब्जावधी ताऱ्यांपैकी एक तारा आहे. त्यामुळे आधुनिक विश्वदृष्टीत पृथ्वीला विश्वाचे भौतिक केंद्र मानले जात नाही.

२. सूर्य आणि चंद्र

विष्णुपुराणात सूर्य आणि चंद्र यांना विश्वरचनेतील स्वतंत्र स्तर दिलेले आहेत. सूर्य हा प्रकाश आणि कालचक्राशी जोडलेला आहे, तर चंद्राच्या गतीचा संबंध कालगणना आणि जीवनचक्राशी जोडलेला दिसतो.आधुनिक विज्ञानानुसार सूर्य हा स्वतः प्रकाश निर्माण करणारा तारा आहे, तर चंद्र हा पृथ्वीचा नैसर्गिक उपग्रह आहे आणि त्याचा प्रकाश परावर्तित सूर्यप्रकाश आहे. येथे एक महत्त्वाचे साम्य मात्र दिसते, दोन्ही परंपरांमध्ये सूर्य आणि चंद्र हे पृथ्वीवरील जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे आकाशीय घटक मानले गेले आहेत. परंतु त्यांचे भौतिक स्वरूप स्पष्ट करण्याची पद्धत पूर्णपणे भिन्न आहे.

३. ग्रहांची संकल्पना

विष्णुपुराणात बुध, शुक्र, मंगळ, बृहस्पती आणि शनि यांचा विशिष्ट क्रमाने उल्लेख आहे. ही बाब महत्त्वाची आहे, कारण या सर्व आकाशीय वस्तू प्राचीन भारतीयांना दृश्य स्वरूपात ज्ञात होत्या.

आधुनिक खगोलशास्त्रातही बुध, शुक्र, मंगळ, बृहस्पती आणि शनि हे सौरमालेतील ग्रह आहेत. मात्र आधुनिक विज्ञान त्यांच्या सूर्याभोवतीच्या कक्षा, वस्तुमान, आकार, रासायनिक संरचना आणि गुरुत्वीय संबंध यांचा स्वतंत्र अभ्यास करते, म्हणून ग्रहांची नावे आणि त्यांचे आकाशातील अस्तित्व याबाबत साम्य आहे; परंतु त्यांच्या भौतिक रचनेची आणि कक्षीय व्यवस्थेची संकल्पना वेगळी आहे.

४. नक्षत्रांची संकल्पना

पुराणांमध्ये नक्षत्रमंडलाला विश्वरचनेतील स्वतंत्र स्तर दिला जातो. आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने मात्र नक्षत्रे म्हणजे पृथ्वीभोवती एका समान अंतरावर असलेली वस्तू नाहीत. आकाशात एकत्र दिसणारे तारे प्रत्यक्षात पृथ्वीपासून अत्यंत वेगवेगळ्या अंतरांवर असू शकतात. तथापि, 'नक्षत्र' ही भारतीय परंपरेतील संकल्पना केवळ धार्मिक नव्हती. आकाशाचे निरीक्षण, कालगणना आणि ऋतूंचे निर्धारण यामध्ये नक्षत्रांना महत्त्वाचे स्थान होते. त्यामुळे त्यांचे सांस्कृतिक तसेच खगोलनिरीक्षणात्मक महत्त्व होते.

५. अंतरांची तुलना

विष्णुपुराणात पृथ्वीपासून सूर्यापर्यंत एक लाख योजन, सूर्यापासून चंद्रापर्यंत एक लाख योजन आणि पुढील स्तरांसाठीही विशिष्ट योजनसंख्या दिली आहे. आधुनिक खगोलशास्त्रात मात्र पृथ्वी-सूर्य अंतर सुमारे १४.९६ कोटी किलोमीटर आहे. ग्रहांची सूर्यापासूनची सरासरी अंतरेही स्वतंत्रपणे निश्चित केली जातात. यामुळे विष्णुपुराणातील योजनसंख्यांचे आधुनिक किलोमीटरमध्ये रूपांतर करून त्यांची थेट आधुनिक कक्षीय अंतरांशी तुलना करणे तितके सोपे नाही. कारण दोन्ही मापनांमागील विश्वमॉडेलच वेगळे आहे.

# वाढदिवसाचे अभिष्टचिंतन!

ज्योतिर्मय साहित्य

श्री.संजय व्यापारी यांचे महाविद्यालयीन शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथेच पूर्ण झालेले. राजबिंडे व्यक्तिमत्त्व, मितभाषी आणि मृदुभाषी स्वभाव, मनाची संवेदनशीलता आणि कलेची मनापासून उपासना हे संजयजींच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक पैलू ! पत्रकारितेची आवड जोपासताना 'ज्योतिर्मय' वृत्तपत्राशी जोडलेले त्यांचे नाते असो किंवा अक्षर, रंग आणि रेखाटनाच्या दुनियेत रमणारे त्यांचे कलाप्रेम असोप्रत्येक क्षेत्रात त्यांचा स्वतःचा एक वेगळा ठसा जाणवतो.


छत्रपती संभाजीनगरमधील सिडको, एन-५ गुलमोहर कॉलनी परिसरात 'रेनबो ग्राफिक्स' या आकर्षक व कलात्मकतेसाठी परिचित असलेल्या ऑफसेट मुद्रण व्यवसायाची त्यांनी अत्यंत व्यावसायिक दृष्टिकोनातून आणि उल्लेखनीय यशस्वी पणे वाटचाल घडवून आणली.

कांही काळ दैनिक लोकमत च्या कार्यालयात कार्य केले तेंव्हाच संपादकाचे तंत्र मंत्राचे कसब आत्मसात केले. ते भावी काळात दै.ज्योतिर्मय च्या संपादन कार्यास उपयोगी पडली.

व्यवसाया सोबतच कौटुंबिक जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत, चि.तब्बूच्या शैक्षणिक वाटचालीला योग्य दिशा देत त्याच्या यशस्वी भवितव्यासाठी केलेले प्रयत्न ही त्यांच्या कर्तव्यनिष्ठ आणि प्रेमळ स्वभावाचीच साक्ष आहे.

रेखाचित्रण कलेचा व्यासंग मनापासून जपत, कला आणि साहित्याची समृद्ध परंपरा लाभलेल्या पुणे नगरीत त्यांनी वास्तव्यास सुरुवात केली. काही वर्षांपूर्वी जुन्या आणि नव्या विचारधारेचा सुंदर मिलाफ असलेल्या 'आधुनिक केसरी' या नियतकालिकाच्या पत्रकारितेची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. पत्रकारिता हा केवळ व्यवसाय न मानता सामाजिक जाणिवा आणि संवेदनशील विचारांना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न त्यांच्या कार्यातून सातत्याने जाणवतो.


संवेदनशील कविमन आणि साहित्याचा छंद लाभल्यामुळे



त्यांच्या लेखणी तून उमटणाऱ्या सुंदर काव्य रचना सोशल मीडियाच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचत असतात. त्यांच्या कवितांमध्ये शब्दांपेक्षा भावनांचा स्पर्श अधिक जाणवतो. जणू मोरपिसाच्या मऊ स्पर्शाशी स्पर्धा करणारे शब्द अंतर्मनाला अलगद स्पर्श करून जातात आणि मन प्रसन्न करून टाकतात!

कविता म्हणजे केवळ शब्दांची गुंफण नव्हे; ती मनाच्या कमलपुष्पाला अलगद फुलवणारी अनुभूती असते. संजयजींच्या काव्यलेखनातून हीच अनुभूती वारंवार प्रत्ययास येते. जीवनातील सुख-दुःख, नाती, संवेदना, माणुसकी आणि अनुभव यांचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत उमटताना दिसते.

या जीवनप्रवासात सौ. अलकाताईंची समर्पित साथ निश्चितच नजरेआड करता येणार नाही. सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी खंबीरपणे सोबत उभे राहणारे सहजीवन हेच तर आयुष्याच्या वाटचालीचे खरे बळ असते. मागील काळात नव्या सुनबाईच्या आगमनाने त्यांच्या त्रिकोणी कुटुंबाला चौथा कोन लाभला आणि घरातील आनंदाला एक नवे परिमाण मिळाले.




संजयजी,

सरस्वती मातेने साहित्य, पत्रकारिता, रेखाचित्रण आणि सर्जनशीलतेचे वरदान आपल्याला मुक्तहस्ताने दिले आहे. या प्रतिभेच्या बळावर नव्या साहित्यिकांची फळी निर्माण करण्याचे सामर्थ्य आपल्या लेखणीत आहे. आपल्या संवेदनशील मनातून आणि प्रतिभावान लेखणीतून यापुढेही असंख्य सुंदर साहित्यकृती जन्माला येवोत, हीच मनापासून अपेक्षा!

आपल्या आगामी आयुष्यात निरामय आरोग्य, आनंद, कौटुंबिक सौख्य, साहित्यिक यश आणि अखंड सर्जनशीलते ची साथ लाभो. आपल्या जीवनातील प्रत्येक नवा दिवस नव्या विचारांचा, नव्या लेखनाचा आणि नव्या आनंदाचा घेऊन येवो, हीच सुखकर्त्या श्रीगणरायाच्या चरणी मनःपूर्वक प्रार्थना!

वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

अभिष्टचिंतन व शुभेच्छा!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# कवितेच्या लाटावर...


















































हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# आपले सण.. आपले उत्सव

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

याच महिन्यात पिठोरी अमावस्या येते, मग पुन्हा घरातले सर्व दिवे माती, तांबे, पितळ, चांदी सर्व स्वच्छ लखलखीत करुन, दिव्यांची यथोचित पूजा करायची मोठ्या पायाखाली रांगोळी काढून स्वच्छ धुतलेल्या नवीन मोठ्या पाटावर कुंकुम रेखून दिव्यांची पूजा करायची. देव्हाऱ्याच्या बाजूला चौसष्ट योगिनींची तस्वीर लावून जिवती ची पिठोरी मातेची यथासांग पूजा, मुलाबाळांच्या रक्षणासाठी आई मनोभावे सर्व करायची. ते सर्व दिवे एकाच वेळी लावले जायचे त्या दिव्य प्रकाशात आईच्या चेहर्यावर चे सोज्वळ तेज अजूनही नजरेसमोर येते. रांगोळ्या, फुलांची सजावट सुग्रास घरगुती पंचपक्वान्नाचा नैवैद्य, धूप ,दीप, पूजा, आरती ते सारे सणासुदीच्या प्रसंग अजूनही आठवतात. सरे श्रावण आता भादव्याची आठवण, येणार बाप्पा, स्वागतासाठी सजवू प्रांगण.



भाद्रपदाच्या पावसातच श्रीगणेशाचे आगमन होणार असते, त्याआधी हरितालिकेचे व्रत असते, कुमारिका सुयोग्य पतीच्या प्राप्तीसाठी, आणि सुवासिनी पतीच्या निरोगी दीर्घायुष्य व जन्मोजन्मी हाच पती मिळावा यासाठी खूप कडक असा निर्जली उपवास करतात,हरितालिका पार्वती ची मनोभावे पूजा करतात, हे सर्व करतांना स्त्रिया घरातील सर्व कामे उरकून सालंकृत वस्त्राभूषणाने, तयार होऊन मनोभावे पूजा करतात.

दुसर्या दिवशी कलाबुद्धिचे दैवत गणपतीबाप्पा येणार असतात, त्याआधी सर्व तयारी व्यवस्थित व्हायला हवी म्हणून घरातील सर्व लहानथोर मंडळी आपल्याला जमतील ती कामे करुन रात्रभर जागरण करतात. आरास करण्याचे काम तर पहाटेपर्यंत चालूच असते, पूजा, नैवैद्य आरास घरातील मंडळी खूप च अगत्याने हे करत असतातच, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे ही मोठ्या उत्साहाने श्री गणेशाच्या स्वागतासाठी तत्पर असतात, देवाची गाणी, आरत्या सर्व खूप छान तयारी चालू असते. लो. टिळकांनी गणेशोत्सव चालू केल्यापासून दरवर्षी गणेशोत्सवाचे महत्त्व आणि माहात्म्य वाढतच गेले आहे. सर्व कुटुंबातील, किंवा आजूबाजूची माणसेही गणेशोत्सवाची आनंदाने वाट पहात असतात. सर्व प्रिय असा सुखकर्ता, दु :खहर्ता श्री गणपती बाप्पा आपल्या घरी कधी येतोय याची वाट पहात असतात, श्री गणेश चतुर्थीला वाजत गाजत गणपती बाप्पा जेंव्हा प्राणप्रतिष्ठा पूर्वक आपल्या आसनावर स्थानापन्न होतात, तेव्हा सर्व भाविकांच्या मनावरचा दडपण उतरते. खूप उत्साहाने भक्ती पूर्वक श्रींची पूजा केली जाते. सुंदर सजावटीत अगदी आनंदाने, प्रेमाने विराजमान झालेले गणपती बाप्पा पाहून प्रत्येकाच्या हृदयात एक

भक्तीपूर्ण विश्वास दाटून येतो, हा प्रेमाचा, भावनेचा गहिवर, त्यातून ओसंडून वाहणारी अपार भक्ती आणि आधार याचा दुवा साधला जातो.

प्रसन्न मंगलमय वातावरण, सुगंधी, सुर्य भक्ती पूर्वक वातावरणात प्रत्येकाची भक्ती आणि विश्वास जागृत होतो.

सामुदायिक रित्या होणार्या सण आणि उत्सवामध्ये सांस्कृतिक, धार्मिक, अध्यात्मिक विकास नक्की च होतो. गणेशोत्सवाच्या दिवसातच गौरीचे आगमन होते. प्रेम, भक्तीभावाने माहेरवाशीण गौरीचे स्वागत पूजाअर्चा नैवैद्य जागरण होते, देवीचा आशीर्वाद घेतला जातो, सर्व च समारंभात देवांची यथोचित पूजाअर्चा केली जाते. मांगल्याचे तेज आणि प्रसन्न उत्साही वातावरण असते. एक दिव्य अनुभूती मिळते. दीड दिवस, पाच, सात, गौरीगणपती विसर्जना नंतर

अनंत चतुर्दशी च्या दिवशी सार्वजनिक गणेश विसर्जन चा मोठा सोहळा असतो.

गणेशोत्सवाच्या सर्व दिवसात आनंद, मांगल्य, आपुलकी, भक्ती सर्वच सकारात्मक गोष्टी पहायला मिळतात.

त्यानंतर पितृपक्ष चालू होतो. आपल्या पितरांचे ऋण फेडण्याचा काळ, म्हणजेच त्यांचा भेटण्याचा काळ या पंधरा दिवसात आपल्याला सोडून जी माणसे या जगात आपल्याबरोबर नाहीत ती या पंधरा दिवसात आपल्याला भेटावयास काकरुपात येतात.

त्यावेळी त्या तिथी आणि ते सर्व पिंडदान वगैरे करावयाचे असते .

पितृपक्षानंतर शारदीय नवरात्र नऊ दिवस नवरात्रीचा गजर, जागर देवी आदिशक्ती, नऊ दिवस नऊ रुपात पृथ्वी तलवार अवतरते ती नऊ दिवस महिषासुराशी युद्ध करणारी महिषासुरमर्दिनी दहाव्या दिवशी ते युद्ध संपते, दुष्ट शक्ती चा नाश करुन अंबामाता विजयी होते. नऊही

रात्रंदिवस देवीचा जागर चालू असतो, अनेक ठिकाणी सार्वजनिक नवरात्रोत्सव चालू असतो. अनेकांच्या घरी अंबा मातेच्या स्वरुपात घट बसविले जातात. खूप मोठ्या भक्ती भावाने पूजा, आरत्या, गोंधळ, भोंडला, गरबा वगैरे कार्यक्रम होतात, भक्ती रसात न्हाऊन देवीची स्तुती गीते म्हटली जातात, भक्तीमय वातावरणात, उत्साहात नवरात्रोत्सव साजरा होतो. विजय पताका लावणारा दसरा, दशमुखी रावणाचा वध,

आपट्याच्या झाडावरील लपवलेली शस्त्रे बाहेर काढण्याचा शस्त्रे पूजण्याचा दिवस, एकंदरीत विजय पताका लावण्याचा, साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा दिवस. हा दिवसही मोठ्या आनंदोत्सव म्हणून साजरा केला जातो.

काही दिवसातच सर्वांचा आवडता मोठ्ठा सण दिवाळी चोहोबाजूंनी आनंदाची खैरात घेऊन येणारा लक्ष लक्ष दीपांनी घरे उजळविणारा आनंदोत्सव येतो.

सडे संमार्जन, वैविध्यरंगावली
आकाशदीप झुले वरी,
लक्षलक्ष दीप दारी
रंग सजावट, लखलखाट
धूप दीप, आरती
सुगंध, सुग्रास, पंच पक्वान्ने
बनती घरोघरी
पै पाहुणे येती जाती
प्रेमाच्या भेटीगाठी
अशी दिवाळी करु साजरी
वसुबारस, धनत्रयोदशी
नरकचतुर्दशी, लक्ष्मी पूजन
बलिप्रतिपदा,भाऊबीज
तुळशी विवाह , देव दिवाळी
सारे उत्साह आनंदाचे उधाण
आतषबाजी रोषणाईउधळण
चला करु सणांचा जागर
मार्गशीर्षात येती दत्त दिगंबर
वैभव लक्ष्मी व्रत गुरुवार
मिळेल सारे भक्ती सार.
पौषमासी तीळगूळ वाटू या
गोड बोलून, सुगडी पुजुनि
सौभाग्य वाण देती सुवासिनी
शाकंभरी पौर्णिमा व्रत करुनि
पुत्रदाएकादशी महत्त्व जाणुनि.
माघ मासी येती बाप्पागणपती
वसंतपंचमोत्सव सरता लगोलग
रथसप्तमी सूर्यदेव रथावर येती
जयाएकादशी पूजेची लगबग.
फाल्गुन मासी महाशिवरात्री
होलिकोत्सव पौर्णिमेच्या रात्री
मराठी महिन्यांच्या बारा मासी
सण उत्सवाचे महत्त्व जाणावे
सकल जनांनी आनंदी व्हावे
एकत्र येऊनि महात्म्य वाढवावे
भक्तीरसात न्हाऊन निघावे.

अशा रितीने आपल्या जीवनात सणांचे अतुलनीय महत्त्वाचे स्थान आहे. हे केवळ सण, किंवा अंधश्रद्धा म्हणून याकडे पाहू नये. तर प्रत्येक सणांमागे शास्त्रोक्त आधारआहे, कौटुंबिक, मानसिक, सामाजिक एकत्रीकरणाचा आधार आहे.

अध्यात्मिक शुद्धीकरणाचा नवचैतन्य जागृतीची जाणीव आहे. संस्कृती आणि परंपरेचा अविभाज्य घटक आहे.

अध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक कारणांनी जेंव्हा काही महत्वाचे दिवस साजरे होतात त्यांना सण म्हणतात.




आपली संस्कृती, परंपरा जपायची असेल तर अशा अध्यात्मिक कारणांनी एकत्र येऊन त्याचे पारंपरिक नियमन केले जाते.

आपली संस्कृती जपण्यासाठी सणांचे महत्त्व जाणून घेतले पाहिजे. ऋतूंमध्ये जसजसे बदल होत जातात तसतसे निसर्गामध्ये वातावरणात बदल होत जातात. खूप पूर्वी पासून ऋषीमुनींनी खगोलीय अभ्यासक्रमानुसार क्षण, प्रहर, वेळ, काळ तिथी, ग्रहगोल, तारे, आकाशगंगा यांचा अभ्यास करून पंचांग निर्मिती केली, पंचांगातील पाच अंगे तिथी, वार, नक्षत्र, योग, करण भूगोल, खगोल, ज्ञान, विज्ञान ज्योतिष शास्त्र, वास्तूशास्त्र वगैरे अभ्यास केला. हे शास्त्र खूप मोठे आणि गहन आहे. हे सांगण्याचा हेतू नव्हता,

पण सण, उत्सव कसे निर्माण झाले तर हे या सर्व नैसर्गिक गोष्टींमुळे याची उत्तरपत्रिका झाली असावी. तात्पर्य असे की,

माणूस हा समूहाने राहणारा प्राणी असल्याने त्याला एकत्र येण्यासाठी, आनंदी,रहाण्यासाठी सण व उत्सव यांचा फार मोठा सहभाग आहे.

निसर्ग आणि देव यांचे आभार मानून आपण सदैव त्यांचे ऋणी राहिले पाहिजे.

# अस्वस्थ वर्तमानाचा खरा चेहरा - माणुसकीची अंत्ययात्रा

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

दुःखालाही स्विकारण्याची तयारीच माणसाला अधिक समृद्ध बनवते, हा आशय अत्यंत सहजपणे व्यक्त झाला आहे.

(पृष्ठ क्र. ६५)

सही

''हिरव्या कागदावर
ओल्या ढळढळीत जखमांनी
लिहिलं जातंय मातीचं हिरवेपण;
हल्ली माती मुळापासून ओली आर्द्रता धरत नाही
गावंपण हरवून जातंय.. शहरांच्या व्याख्या बदलतायत..
दिवस ढळत जातात अन् रात्री पिळून निघतात;''

ही मुक्तछंदातील कविता लालफितीच्या प्रशासकीय संस्कृतीवर केलेले प्रभावी भाष्य आहे. नोकरशाहीतील औपचारिकता, संवेदनाहीनता आणि सामान्य माणसाच्या असहायतेचे चित्रण कवीने कोणताही आक्रस्ताळेपणा न करता अत्यंत संयतपणे केले आहे.


(पृष्ठ क्र. ६९)

शापितांचा गाव या अभंगात आधुनिकतेच्या प्रवाहात हरवलेल्या गावपणाची वेदना मांडलेली दिसते. बदलत्या सामाजिक वास्तवात परंपरा, आपुलकी आणि माणुसकीची होत चाललेली घसरण यातून अधोरेखित होते. तर शुक्रतारा या कवितेतील ''मोगऱ्याला काळजीने बहर येतो'' ही प्रतिमा कवीच्या कल्पनाशक्तीचे आणि काव्यभाषेवरील प्रभुत्वाचे द्योतक आहे.

(पृष्ठ क्र. ९२)

चंद्र माधवीचा ही कविता वाचताना ग्रेस यांच्या काव्यशैलीची आठवण येते. गूढता, प्रतिमासंपन्नता आणि सूचक अभिव्यक्ती यांचा सुंदर मिलाफ येथे दिसतो. निशेचे दान ही कविताही त्याच संवेदनशील भावविश्वाची विस्तारलेली अनुभूती देते.

संपूर्ण संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे आशयातील वैविध्य आणि अभिव्यक्तीतील प्रामाणिकपणा. गझल, मुक्तछंद आणि गीत अशा विविध काव्यप्रकारांतून कवीने स्वतः




ची स्वतंत्र अभिव्यक्ती घडवली आहे. कुठे सामाजिक वास्तवाचा कठोर स्पर्श आहे, तर कुठे निसर्ग, प्रेम, नाती आणि मानवी मूल्यांची कोमल जाणीव आहे. त्यामुळे हा संग्रह केवळ वाचनीय राहत नाही, तर विचार करायला भाग पाडणारा ठरतो.

पहिलाच काव्यसंग्रह असूनही कवी प्रदीप बडदे यांनी परिपक्व आशय, संवेदनशील अभिव्यक्ती आणि भाषेवरील पकड यांमुळे स्वतःची स्वतंत्र काव्यओळख निर्माण केली आहे. माणुसकीची अंत्ययात्रा हे शीर्षक जरी अस्वस्थ करणारे असले, तरी संग्रहातील कविता माणुसकीचा अंत नव्हे, तर तिच्या पुनर्जन्माची आशा जागवतात. हीच या संग्रहाची खरी ताकद आहे. कवीच्या प्रतिभेची साक्ष देणारी ही कविता अधिक चिकित्सक ठरतेय. ती केवळ काव्यसंग्रहाच्या आशय, प्रतिमा, भाषाशैली, प्रतिकात्मकता आणि सामाजिक जाण यांचे योग्य मूल्यांकन करते. प्रदीप बडदे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. त्यांच्या लेखणीतून भविष्यातही अशाच आशयसमृद्ध, चिंतनशील आणि वाचकांच्या मनाला भिडणाऱ्या साहित्यकृती जन्माला येत राहोत, हीच सदिच्छा.

जयेश मोरे (शिशिर) - ठाणे

काव्यसंग्रह : माणुसकीची अंत्ययात्रा
कवी : प्रदीप बडदे, नवी मुंबई
पाठराखण : ऐश्वर्य पाटेकर
मुखपृष्ठ/ रेखाटन : सरदार जाधव
पृष्ठे : १०४ (जॅकेटफोल्ड)
मो. : ९५९४०२७९९५ - (घरपोच उपलब्ध)

***

# सखींनो, चाळीशी गाठली म्हणून काय झालं...!

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)


पण, हळूहळू अनघाला कळू लागलं होतं. कि, स्वतःसाठी मी कुठेतरी कमी पडते आहे म्हणून. आता अनघा ''माझ्यातली मी'' सजगतेने शोधत होती. अलगद पणे ती स्वतःचा मागोवा घेत होती. पहाटे लवकर उठुन घरातील कामाकडे धाव घेणारी अनघा आता योगा करू लागली, अगदी मस्त, बिनधास्त राहु लागली, साठवलेल्या पैशातून स्वतःसाठी सुंदरशी पैठणी घेतली, मस्तसं फोटोशूट केलं. नि स्वतःचे फोटो पाहुन आनंदून गेली.

तसे पाहता, खरं तर चाळीशीत प्रत्येक स्त्रीला डिलिव्हरी मध्ये हवी तशी काळजी न घेतल्यामुळे किंवा म्हणावा तसा आराम न मिळाल्यामुळे मान, पाठ, कंबर, पाय, गुडघे दुखी चालू होते. आणि हे दुखणं चालू झालं की, मग नैराश्य येतं. आपल्या शरीराची नैसर्गिक लवचिकता कायम टिकवून ठेवण्यासाठी दररोज नियमित पणे योगा अत्यावश्यक आहे. योगामुळे शरीराला आराम मिळतो. रिकामी पोटी कोमट लिंबुपाणी, बिट ज्युस, पुदिना, तुळशी, जांब, कडुनिंबाची पाने सेवन करणे. तसेच बॉडी डिटॉक्स करण्यासाठी खारीक, काजू बदाम, किशमिश, मखाने खाणे किंवा या सगळ्याचे मिक्सचर करून लाडू बनवून नियमित खाणे. म्हणजे चाळीशीतून पंचवीशीत जाणे होय.

चाळीशी आली कि बायका निस्तेज दिसू लागतात. नैराश्य, आळस, मनाची उद्विग्नता, कंटाळा, स्वतःसाठी कांही करायचं म्हटलं कि, बघु नंतर. या गोष्टीचा कंटाळा, नकारात्मक विचार वा मानसिकता, वैचारिक दडपण. या सर्व गोष्टींचा उगम आवर्जून चाळीशीत होतोच. पण या सर्व गोष्टी बाजूला सारून आपण सकारात्मक विचारांची वेणी गुंफली की चाळीशीचा स्ट्रेस येतच नाही. कारण चाळीशी म्हणजे स्वतःसाठी जगण्याचं वय.



चाळीशी गाठली म्हणून तरणीताठी अंगकाठी परतीला लागत नाही. खरं आयुष्य तर आता इथूनच सुरु होतं. कारण प्रत्येक स्त्रीच्या जीवनातली, आयुष्यातली हिच तर ''नवी सोनेरी पहाट'' असते. सतत बांधून ठेवलेली वेणी आता मोकळ्या केसांमध्ये हरवून जाते. त्या मोकळ्या केसांमध्ये मोगरा, काकडा, चाफा, चमेली, जाई-जुई, निशिगंधं रुपी चमचमत्या चांदण्या चमकत ''ती'' चं रुप सौन्दर्य खुलवीत असतात. सेफ्टी पिन न लावता ओबड-धोबड, वेडी वाकडी नेसलेल्या साडीच्या जागी आता प्रेस केलेली साडी अंगावर शिस्त बसते, जुन्या संदूकात ठेवलेली नथ आता नटण्या मुरडण्यासाठी बाहेर काढली जाते.




सगळ्यांची मर्जी राखून झाली, सर्वांचे रुसवे-फुगवे बघून झाले, लाड पुरवून झाले, सगळ्यांसाठी सगळं करून झालं. चाळीशी म्हणजे आता स्वतःचे लाड पुरवण्याची वेळ आहे. हे काय म्हणतील? ते काय म्हणतील? हा विचार करण्यात अर्ध आयुष्य संपतं. आता जगा स्वतः साठी, स्वतःशी संवाद साधा, स्वतःशी मोकळेपणाने बोला. पुरे झालं आता दडपणाखाली जगणं. मोकळा श्वास घेऊन आनंदाने हुंदडा. बालपणीच्या मैत्रिणींना भेटा, खुप खुप गप्पा मारा, दिलखुलास हसा, साडीचा पदर वाऱ्यावर उडवत हिरव्यागार गवतातून सात-आठ पाऊले पळून तर बघा.

कामं काय होतंच राहतील ती बाजूला ठेऊन कडक असा एक कप चहा, कॉफी घ्या. मनाला तरतरी येऊद्या, चहा घेताना जुन्या आठवणींना उजाळा देत त्या दिवसांमध्ये रममाण व्हा. पडदे, सोफा कव्हर, बेडशीट फार झालं घेऊन. आता मेकअप बॉक्स घ्या, बांगड्या घ्या नटून सजून छान दिसा. सगळ्या जबाबदाऱ्या, कर्तव्य पार पाडून झाली. कसलाही, कुठलाही विचार मनात न ठेवता, न आणता पुढचं पाऊल टाकत तुमच्या स्वप्नांची रंगीन लाली उजळू दे आकाशी. चाळीशीत आपणच स्वतःला म्हटलं पाहिजे.

''छानसं सजून एकदा आरशात तर बघ, मनसोक्त जगून तर बघ, पायांमध्ये घुंगरू बांधून आवडत्या गाण्यावरती थोडंसं थिरकून तर बघ, नखे वाढवून त्यांना सुंदर शेप देऊन तर बघ, न्यू ट्रेंड नुसार चालून तर बघ, रोज एक नवी साडी नेसून तर बघ, जेवण झाल्यावर शतपावली करताना जुनी गाणी ऐकून तर बघ, आता स्वतःला थोडा वेळ देऊन तर बघ, अगं तो आरसा तुझी वाट पाहतो आहे मराठमोळा मेकअप करून लाजत लाजत स्मितहास्य करत नव्याने स्वतःला आरशात तर बघ, एकदा खळखळून हसून तर बघ.'' तेव्हा खऱ्या अर्थाने कळेल चाळीशीतील आपलं नव्याने खुललेलं, सर्वांना लाजवेल असं ''चाळीशी नवंलखं सौन्दर्य''.

तेरी उमर हो गयी
तेरे सपनोंकी शाम ढल गयी
जमाना केहता हैं केहने दो
तुझे सज धज के रेहना हैं
नयी आशाओंके साथ तुझे
तेरे सपनोंकी ऊंची उडान भरना हैं

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# परीक्षाभिमुख शिक्षण आणि कल्पनाशक्तीची उपासमार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आजच्या शिक्षणव्यवस्थेचे सर्वात मोठे यश म्हणजे मुलाला किती गुण मिळाले, कितव्या क्रमांकावर आले आणि कोणत्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला, या सर्वांचे होणारे मोजमाप होय. मात्र त्याच व्यवस्थेचे सर्वात मोठे अपयश म्हणजे मुलाने आयुष्यात एकही स्वतंत्र प्रश्न विचारला का, एकही नवी कल्पना जन्माला घातली का आणि जगाकडे स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्याची हिंमत दाखवली का, याचे उत्तर बहुतेक वेळा नकारार्थी येते. परीक्षाभिमुख शिक्षण हे केवळ अभ्यासक्रम नाही; ते एक मानसिक वातावरण आहे. त्या वातावरणात कल्पनाशक्ती हळूहळू उपाशी पडते, नंतर सुकते आणि शेवटी बहुतेक मुलांच्या आयुष्यातून गायब होते.

परीक्षा म्हणजे ज्ञान तपासण्याचे साधन असले पाहिजे. प्रत्यक्षात ती ज्ञानाची जागा घेते. मुलाला शिकता येत नाही, त्याला फक्त आठवते. आठवणे आणि समजणे यात फरक आहे. समजण्यासाठी वेळ लागतो, चुका होतात, गोंधळ होतो, प्रश्न पडतात. परीक्षाभिमुख व्यवस्थेत हा गोंधळ अपराध ठरतो. चुकीचे उत्तर म्हणजे कमी गुण, कमी गुण म्हणजे कमी संधी, कमी संधी म्हणजे भीती. भीती ही कल्पनाशक्तीची सर्वात मोठी शत्रू आहे. भीतीत राहणारे मूल नवीन गोष्ट करण्याचे धाडस दाखवत नाही. ते फक्त सुरक्षित उत्तर शोधते. सुरक्षित उत्तर म्हणजे पाठ्यपुस्तकातील वाक्य, मार्गदर्शकातील सूत्र आणि कोचिंग वर्गातील नोंद. त्या पलीकडे काहीच नाही.

विशेषतः दहावी आणि बारावीच्या वर्गात, मुलाचे दिवस तीन गोष्टींभोवती फिरतात: अभ्यासक्रम संपवणे, मागील प्रश्नपत्रिका सोडवणे आणि मॉडेल पेपर लिहिणे. या चक्रात कथा वाचण्यासाठी, निसर्गाचे निरीक्षण करण्यासाठी, एखाद्या यंत्राचे तुकडे करून पाहण्यासाठी किंवा मित्रांशी निरुद्देश संभाषण करण्यासाठी जागा उरत नाही. निरुद्देश वेळ हा कल्पनाशक्तीचा कच्चा माल आहे. जो समाज मुलाला प्रत्येक तास ''उपयोगी'' करायला लावतो, तो समाज खरे तर मुलाच्या आतल्या लेखकाचे, शास्त्रज्ञाचे, चित्रकाराचे आणि नागरीकाचे भवितव्य मारत असतो. उपयोगितावादाच्या या अतिरेकात शिक्षण हे ज्ञानाचे उत्सव न राहता गुणांची बाजारपेठ बनते.

कल्पनाशक्ती म्हणजे केवळ कविता लिहिणे किंवा चित्र काढणे नाही. ती म्हणजे न दिसणारी शक्यता पाहण्याची क्षमता. एखाद्या प्रश्नाचे एक नव्हे तर पाच उत्तरे शोधणे, अपयशातून नवीन मार्ग काढणे, दुसऱ्याच्या जागी स्वतःला ठेवून विचार करणेही सर्व कल्पनाशक्तीची कामे आहेत. परीक्षा मात्र एकच बरोबर उत्तर मागते. एकच पद्धत, एकच व्याख्या, एकच निष्कर्ष. अशा शिक्षणात मुलाला ''का?'' विचारायची सवय होत नाही. ''का?'' हा प्रश्न संपला की विचार



संपतो. विचार संपला की मनुष्य केवळ चांगला कर्मचारी होऊ शकतो, चांगला नागरिक किंवा चांगला निर्माता होऊ शकत नाही.

या व्यवस्थेचे परिणाम शाळेबाहेरही दिसतात. कॉलेजमध्ये आलेले विद्यार्थी नोट्स मागतात, स्वतः वाचत नाहीत. नोकरीत आलेले तरुण सूचनांची वाट पाहतात, स्वतः निर्णय घेत नाहीत. संशोधनात आलेले विद्यार्थी गुरूंनी दिलेल्या विषयावर काम करतात, स्वतःचा प्रश्न शोधत नाहीत. ही सर्व परीक्षाभिमुख मानसिकतेची फळे आहेत. आपण मुलांना यश शिकवतो, पण यशाची व्याख्या इतकी अरुंद केली आहे की त्यातून जिज्ञासा, धैर्य आणि मौलिकता बाहेर पडू शकत नाहीत.

नेहमीचा युक्तिवाद असा असतो की स्पर्धा आहे, जागा कमी आहेत, म्हणून परीक्षा कठोर असणे भाग आहे. स्पर्धा ही वस्तुस्थिती आहे, पण स्पर्धेचे एकमेव मापदंड गुण असणे ही निवड आहे. एखाद्या समाजाची प्रगती फक्त किती अभियंते आणि डॉक्टर निघाले यावर अवलंबून नसते. ती त्या अभियंत्याने नवीन समस्या कशी सोडवली, त्या डॉक्टरने रुग्णाला किती समजून घेतले आणि त्या शिक्षकाने मुलाला किती स्वतंत्र विचार करायला शिकवले, यावरही अवलंबून असते. गुणांची स्पर्धा ही सोपी स्पर्धा आहे. ती मोजता येते. कल्पनाशक्तीची स्पर्धा अवघड आहे, कारण ती मोजता येत नाही. म्हणून व्यवस्था नेहमी मोजता येणाऱ्या गोष्टीला प्राधान्य देते आणि न मोजता येणारी गोष्ट दुर्लक्षित करते.

शाळेतील कला, संगीत, खेळ, वाचन आणि प्रयोग हे ''अतिरिक्त'' विषय बनले आहेत. ते अतिरिक्त नाहीत. ते मुलाच्या मेंदूला लवचिक बनवतात. लवचिक मेंदू परीक्षाही चांगली देतो आणि आयुष्यही चांगले जगतो. पण पालक आणि व्यवस्था दोघेही या विषयांना वेळेचा अपव्यय समजतात. परिणामी मुलाला फक्त एकच कौशल्य येतेदडपण सहन करून उत्तर लिहिणे. दडपण सहन करणे हे कौशल्य नाही, ते जगण्याची सक्ती आहे. सक्तीने तयार झालेली पिढी कधीही मुक्त विचार करू शकत नाही.

कल्पनाशक्तीची उपासमार ही फक्त वैयक्तिक शोकांतिका नाही, ती सामाजिक नुकसान आहे. ज्या समाजाला नवीन प्रश्न पडत नाहीत, तो समाज जुने उत्तरे पुन्हा पुन्हा वापरतो. जुने उत्तरे नवीन समस्या सोडवत नाहीत. हवामान बदल, शहरे, आरोग्य, रोजगार, नीतिमत्ताया सर्व क्षेत्रांत कल्पक विचारांची गरज आहे. पण आपली शिक्षणव्यवस्था मुलांना कल्पक बनवण्याऐवजी त्यांना अनुकरण करणारे बनवते.




अनुकरणाने चांगली नोकरी मिळू शकते, पण चांगले भविष्य घडत नाही.

यावर उपाय म्हणजे परीक्षा रद्द करणे नाही. परीक्षा हव्यात, पण त्या ज्ञानाच्या सेवकांच्या भूमिकेत राहिल्या पाहिजेत, मालकांच्या नाही. मूल्यमापन विविध असले पाहिजे. प्रकल्प, चर्चा, प्रयोग, लेखन, निरीक्षण आणि सहकार्य यांना गुणांइतकेच महत्त्व मिळाले पाहिजे. शिक्षकांना पाठ्यक्रम संपवण्याच्या धास्तीतून मुक्त केले पाहिजे. मुलाला चूक करण्याची, वेळ वाया घालवण्याची आणि निरुद्देश शोध घेण्याची परवानगी दिली पाहिजे. निरुद्देश शोध हा कधीही वाया जात नाही. तोच पुढे मोठ्या शोधाचे बीज ठरतो.

पालकांची भूमिकाही निर्णायक आहे. गुणांच्या पत्रिकेवर नाव नसल्यामुळे मुलाची किंमत कमी होते, असे वागणे हे हिंसाचाराचे एक सुसंस्कृत रूप आहे. मुलाने काय विचार केला, काय वाचले, कशाबद्दल उत्सुकता दाखवली, याची चौकशी गुणांच्या चौकशीइतकीच गांभीर्याने व्हायला हवी. घरात पुस्तक असणे, प्रश्न विचारले जाणे आणि चुकीला शिक्षा न होणेही छोटी वातावरणे कल्पनाशक्तीचे रक्षण करतात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात कल्पकता, चिकित्सक विचार आणि समग्र विकासाची भाषा आहे. भाषा पुरेशी नाही. वर्गात काय घडते, घरी काय बोलले जाते आणि समाजात यशाची व्याख्या काय आहे, या तीन गोष्टी बदलल्या तरच ती भाषा सत्यात उतरेल. आजही बहुतेक शाळा, कोचिंग वर्ग आणि पालक जुनी परीक्षाभिमुख रीतच चालवतात. धोरण कागदावर आहे, भीती वर्गात आहे.

मुलांना शिकवायचे असेल तर त्यांना भीतीमुक्त जागा द्यावी लागते. भीतीमुक्त जागेतच कल्पना उगवते. कल्पना उगवली की मुलाला जगाचे अर्थ स्वतः लावता येतात. स्वतः अर्थ लावता आला की तो केवळ उत्तीर्ण विद्यार्थी राहत नाही, तो विचार करणारा मनुष्य होतो. शिक्षणाचे अंतिम ध्येय उत्तीर्ण विद्यार्थी तयार करणे नसून विचार करणारे मनुष्य तयार करणे आहे.

परीक्षाभिमुख शिक्षणाने आपण मुलांना शर्यतीत तर आणले, पण शर्यतीच्या पलीकडचे जग दाखवले नाही. त्या जगात प्रश्न आहेत, सौंदर्य आहे, अनिश्चितता आहे आणि निर्माण करण्याचा आनंद आहे. ते जग कल्पनाशक्तीशिवाय दिसत नाही. कल्पनाशक्ती उपाशी ठेवून आपण मुलांना गुण देतात, पण आयुष्य हिरावून घेतात. ही देवाणघेवाण महाग आहे. ती थांबवणे ही केवळ शैक्षणिक सुधारणा नाही, ती सांस्कृतिक जबाबदारी आहे.

शाळा, घर आणि समाज या तिघांनी एकत्र येऊन एक साधा प्रश्न विचारला पाहिजे: आपण मुलाला किती गुण मिळाले हे विचारतो, पण त्याने आयुष्यात काय शोधले हे का विचारत नाही? जोपर्यंत हा प्रश्न गंभीरपणे विचारला जात नाही, तोपर्यंत परीक्षा जिंकणारी पिढी तयार होईल, पण जग बदलणारी पिढी तयार होणार नाही. कल्पनाशक्तीची उपासमार थांबवणे म्हणजे मुलांना पुन्हा विचार करण्याचा अधिकार देणे. तो अधिकार शिक्षणाचा गाभा आहे. तो गमावला की शिक्षण केवळ नोकरीची तयारी राहते, आयुष्याची तयारी राहत नाही.

***

# अविस्मरणीय अंदमान सफर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

अथांग सागर, निळेशार पाणी, निसर्गाचे अद्भुत रूप दिसे,
सावरकरांच्या पावन भूमीत, मन हे माझे नतमस्तक होतसे !


मागील वर्षभरापासून मनात ठरवलेली आणि स्वप्नात रंगवलेली अंदमानची सफर अखेर पूर्ण झाली! निसर्गाचे एक आगळेवेगळे, अद्भुत आणि तितकेच थरारक रूप या प्रवासात अतिशय जवळून अनुभवता आले. आमच्या ''आनंद हास्य योगा ज्येष्ठ नागरिक संघ पिंपळे सौदागर, पुणे च्या वतीने आयोजित या सहलीसाठी जेव्हा आम्ही पुण्याहून विमानाने निघालो, तेव्हापासूनच आमचा उत्साह ओसंडून वाहत होता. पोर्ट ब्लेअरच्या भूमीवर पाऊल ठेवताच एका वेगळ्याच आनंदाने आमचा ताबा घेतला. बंगालच्या उपसागराचा तो अथांग निळाशार विस्तार आणि अवतीभवती पसरलेली हिरवीगार झाडी मनाला भुरळ पाडत होती.

**क्रांतिवीरांच्या बलिदानाचा साक्षीदार :**

सेल्युलर जेलपोर्ट ब्लेअरला पोहोचल्यावर आमची पहिली भेट होती ऐतिहासिक सेल्युलर जेलला, ज्याला आपण काळे पाणी म्हणून ओळखतो. त्या काळकोठड्या, तिथल्या भिंती आणि तिथला इतिहास ऐकताना अंगावर अक्षरशः काटे उभे राहतात. आपल्या मातृभूमीसाठी क्रांतिवीरांनी भोगलेली काळ्या पाण्याची अमानुष सजा, ब्रिटिशांनी दिलेली फाशी... हा सगळा थरार ऐकताना डोळे ओलावले आणि ऊर अभिमानाने भरून आला. तिथेच रात्री पाहिलेला प्रकाश आणि ध्वनी शो तर अंगावर रोमांच उभा करणारा होता. तो आवाज, तो प्रकाश आणि स्वातंत्र्यलढ्याचा तो इतिहास जणू आमच्या डोळ्यांसमोर जिवंत झाला.

**सावरकरांच्या पावन भूमीत शिक्षक दिन**

या संपूर्ण सहलीचा सर्वात महत्त्वाचा, आदरयुक्त आणि भावनिक क्षण ठरला तो म्हणजे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या या पावन भूमीत, अथांग समुद्राच्या साक्षीने आमचा शिक्षक दिन साजरा करण्यात आला.आनंद हास्य क्लबचेअध्यक्ष




आदरणीय दिगंबर राजगुरे , कमिटी सदस्य आणि समन्झ ग्रुपच्या उत्साही मुलांनी मिळून आम्हा शिक्षकांचा जो यथोचित सत्कार केला, ते आम्हा सर्व शिक्षकांसाठी एका अविस्मरणीय आणि अमूल्य गिफ्ट सारखे होते. सावरकरांच्या त्या त्यागमय भूमीत मिळालेला हा सन्मान प्रत्येकाच्या हृदयात कायमचा कोरला गेला आहे.

**समुद्राच्या लाटा आणि बेटांची सफर**

अंदमानचा प्रवास म्हणजे विविध बोटींमधून फिरण्याचा एक नितांत




सुंदर सोहळा! आलिशान क्रूझ फेरी, समुद्राची अथांगता अनुभवून देणारी जहाज फेरी आणि पाण्यातून वेगाने वाट काढणारी छोटी वेगवान बोट, या सर्वांतून मनसोक्त फिरण्याचे भाग्य आम्हा ज्येष्ठ नागरिकांना लाभले. आम्ही क्रूझने हॅवलॉक म्हणजेच स्वराज द्वीप येथे पोहोचलो. तिथल्या जगप्रसिद्ध राधानगर समुद्रकिनाऱ्यावर आणि कालापत्थर किनाऱ्यावर समुद्राच्या पाण्यात डुबकी मारण्याचा आनंद घेतला, तेव्हा आमचा बालपणीचा उत्साह पुन्हा जागा झाला.त्यानंतर आम्ही नील आयलँड म्हणजेच शहीद द्वीप येथील निसर्गरम्य भरतपूर किनाऱ्याला भेट दिली. तिथे कोसळणाऱ्या पावसात नैसर्गिक दगडाचा पूल पाहिला आणि निसर्गाची अद्भूत किमया अनुभवली. काचेच्या तळाची बोट सफरीमधून समुद्राच्या तळाशी असलेले रंगीबेरंगी पाण्याचे जग आणि अद्भुत समुद्री जीवसृष्टी जवळून पाहताना मन थक्क झाले.


यानंतर ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस द्वीप (रॉस आयलँड) ची सफर केली. तिथल्या ऐतिहासिक वास्तू, निसर्ग आणि मुक्तपणे फिरणारी हरणे पाहून मनाला एक वेगळीच शांतता मिळाली. विशेष म्हणजे, तिथे हरणांशी मायेने संवाद साधणाऱ्या अनुराधा राव यांची भेट झाली व त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची एक सुवर्णसंधी मिळाली. आमच्या मित्रमैत्रिणींनी अंदमान मधील निसर्गसौंदर्याची अप्रतिम छायाचित्रे काढून हे सुंदर क्षण कॅमेऱ्यात टिपले.

**बाराटांगची थरारक अनुभूती**

या ट्रीपमधील सर्वात कठीण आणि थरारक टप्पा म्हणजे बाराटांगची सफर! कोसळणारा पाऊस आणि निसरडी वाट तुडवत आम्ही तिथल्या जगप्रसिद्ध चुनखडीच्या गुहा (मार्बल रॉक लेणी) बघायला गेलो. कठीण दगडाची पाऊस आणि हवामानामुळे कशी झीज होऊ शकते, याचे उत्तम उदाहरण तिथे पाहायला मिळाले. वयाची तमा न बाळगता, पाऊस आणि चिखलाची पर्वा न करता, आमच्या संघाच्या सर्व सदस्यांनी मोठ्या हिमतीने, जिद्दीने आणि उत्साहाने ही सफर पूर्ण केली. एकंदरीत ही ऐतिहासिक सफर, निसर्गाच्या सानिध्यात आणि बंगालच्या उपसागरात बोटीने व क्रूझने अत्यंत आनंदात पार पडली.


समन्झ ग्रुपचे उत्तम नियोजन, राहण्या-खाण्याची देखणी व्यवस्था आणि प्रत्येकाला मिळालेला आपुलकीचा आधार यामुळे ही ट्रीप आमच्या आनंद हास्य योगा ज्येष्ठ नागरिक संघासाठी आयुष्यभराची शिदोरी ठरली आहे.


जरी संपला हा प्रवास, तरी आठवणींचे दीप मनात जळत राहतील, अंदमानच्या निळ्या लाटा, काळजाच्या कोपऱ्यात कायम रुंजी घालत राहतील.










हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# सर्वज्ञ : श्री चक्रधर स्वामी

**ज्योतिर्मय साहित्य**

परमेश्वर स्वयंप्रकाशित आहे....

यथा सूर्य, सूर्य उगवल्याबरोबर तो आपणेयाते प्रकाशी व सर्व जगाते प्रकाशी. त तद्वत् परमेश्वर स्वतः चा प्रकाश करून विश्वाच्या मूलभूत तत्वाचा म्हणजेच जीव, देवता व प्रपंच यांचाही प्रकाश करतात. परमेश्वर अप्रमेयु आहे म्हणजेच वेदाच्या चहू प्रमाणांनी प्रकाशित होत नाही. म्हणजेच शब्दाने, साहित्याने, अनुमानाने, उपमानाने वा प्रत्यक्ष प्रकाशमान होत नाही. परमेश्वराने अधिकारी जीवांचा बोध व बोधशक्ती दिल्यानंतरच तो प्रकाशतो.... अर्थात.... परमेश्वराने ती बोधशक्ती दिधलियाविण कव्हणाही घेवो घोटो नये म्हणून परमेश्वराच्या कृपेला आपण पात्र कसे होऊ याचा मानवाने नक्कीच विचार करावा.....

जसे कृता -त्रेतायुगात श्री दत्तात्रेय आणि द्वापारयुगामध्ये श्रीकृष्ण... तसेच कलियुगात श्रीचक्रधरस्वामी आहेत.. बाराव्या शतकातील साक्षात परमेश्वर अवतार आणि महानुभाव पंथाचे संस्थापक आहेत.

द्वापरी श्रीकृष्ण चक्रवर्ती
गोसावियाचे चरण शरण ।
सैह्याद्री श्रीदत्तात्रेयप्रभू
गोसावियाचे चरण शरण ।
द्वारावतीए श्रीचांगदेव राऊळ
गोसावियाचे चरण शरण ।
रिद्धपुरी श्रीगुंडमराऊळ
गोसावियाचे चरण शरण ।
प्रतिष्ठानी श्रीचांगदेव राऊळ
गोसावियाचे चरण शरण ।....

आता वरील नामाचा अर्थ बघा.... प्रतिष्ठानी म्हणजेच पैठण, श्री म्हणजे ऐश्वर्य..... श्री शब्द उपाधीवाचक अथवा श्री म्हणजे अनंत ब्रह्मांडाचा व्यापार करणारी चैतन्यमाया, चांग म्हणजे बरवेपण, सौंदर्य, लावण्य: देव म्हणजेच परमेश्वर स्वरूप किंवा दातृत्वावाचक एवं ज्ञान प्रमाचे दातृत्व करणारा... किंवा दिव् हा धातू प्रकाशी वर्ते म्हणजेच अनादीचे चार पदार्थ, जीव, देवता, प्रपंच, परमेश्वर यांचा प्रकाश कार्याला आणणे. राऊळ म्हणजे जडा, चेतनाशक्तीचा राजा : गोसावी म्हणजे जीव, देवतांचा स्वामी तयाचे चरण म्हणजेच श्री चरण एवं पदकमलाच्या ठायी, शरण म्हणजे शरणागत किंवा तयाचे दोन्ही चरण माझे रक्षण करोत.....



आत्मोन्नतीचे उच्चतम ध्येय साध्य होण्यासाठी एकमेव परमेश्वराची शरणागती पत्करावी लागते... अर्थात प्रत्येकाची ही स्वातंत्री आहे.

शिस्तस्ते.. हं शाधि मां त्वां प्रपंन्नम्‍ अशी जेव्हा अर्जुनाने भगवंतापुढे शरणागती पत्करली तेव्हाच कोठे द्वापारयुगात श्रीकृष्ण गीतेद्वारे आपले ईश्वरीय ज्ञान अर्जुनाला निमित्य करून आमजनतेला सांगितले.... तेच ईश्वरीय ज्ञान सांप्रत कलीयुगात सर्वज्ञ श्री चक्रधर प्रभुनी सुटसुटीत सोप्या मराठी भाषेत सूत्रपाठद्वारा आपल्या शिष्यगणांना सांगितले..... व आपल्या कर्तुम कर्तुमन्यथाकर्तुम् शक्तीने अनंत जीवांना दुःखापासून मुक्त करून त्यांचा उद्धार केला. हीच ती अतीप्राचीन काळापासून चालत आलेली सर्वश्रेष्ठ भारतीय-- महानुभावीय संस्कृती होय....

भारतीय उज्वल परंपरेचा वारसा म्हणजेच महानुभाव पंथ.

इतिहासात त्याच्या तत्वप्रणालीला कोठेच तोड नाही. प्रत्येक युगात धर्माची संस्थापना करण्यासाठी तसेच अनीती अन्यायाचे निर्मूलन करण्यासाठी परमेश्वर अवतीर्ण होत असतात. व या भारतीय संस्कृतीचे संवर्धन करीत असतात... म्हणजेच जीवोद्धरणाची पवित्र सम्यक् कृती करीत असतात....

जगाच्या पाठीवर परमेश्वर उक्त असे दोनच ग्रंथ उपलब्ध आहेत....

द्वापरयुगातील भगवान श्रीकृष्णोक्त श्रीमद्भवतगिता हा संस्कृत भाषेतील एकमेव जगन्मान्य अध्यात्मिक धर्मग्रंथ होय. तर सांप्रत कलियुगातील सर्वज्ञ श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ -लिळाचरित्र हा मराठी भाषेतील गुह्य तत्वज्ञानाने ओतप्रोत भरलेला एकमेव अध्यात्मिक धर्मग्रंथ होय.....




या दोन्हीही पवित्र धार्मिक ग्रंथाचे तत्वज्ञान एक असून ते आत्मकल्याणाचे मार्गदर्शक आहेत.....

पंडित म्हाईभट (सराळेकर ) हे लिळाचरित्राचे कर्ते. आपणा सर्वांना अभ्यासावरून ज्ञात आहेच.

लिळाचरित्र हा मराठी भाषेतील पहिला गद्यग्रंथ, आद्यग्रंथ आणि चरित्रग्रंथ आहे. अनलंकृत शैलीमुळे तो तत्कालीन महाराष्ट्राच्या जीवनाचा अभिलेखही आहे. सर्व महानुभाव वांग्मयाचे बीज याच ग्रंथात आहे. इ. स. १२०० हा काळ लिळाचरित्र रचनेचा आहे.

महानुभाव पंथाच्या तत्वज्ञानानुसार ईश्वराच्या पंचावतारांपैकी श्री चक्रधरस्वामी पाचवा अवतार आहेत. लीळाचरित्र या मराठीतील पहिला चरित्रग्रंथ याचे केंद्रबिंदू श्री चक्रधरस्वामीच आहेत. म्हणूनच इतिहासात त्यांना महत्वाचे स्थान आहे... वैदिक परंपरेला नाकारून स्त्री -शूद्रांसह सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देणाऱ्या, सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचे नाव महाराष्ट्रातील समाजसुधारकांमध्ये आधी घ्यावे...

सर्व प्राणीमात्रांना अभय देणाऱ्या सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामींचे परावाणीत घोळलेले अध्यात्म -तत्वज्ञान आत्मसात केल्याखेरीज श्रीमद् -भगवद्-गितेतील गुह्य तत्वज्ञान यथार्थाने आकलन होऊ शकत नाही...

श्रीमद् भगवद्-गीता आणि सूत्रपाठ -लिळाचरित्र हे पवित्र धार्मिकग्रंथ सोबतच सर्व विद्यांचा श्रेष्ठ राजा, अती गुह्यातील गुह्यांचा मुकुटमणी.. प्रत्यक्ष आचरणाने अनुभूतीला येणारा, उत्तमातील उत्तम, अतीपवित्र, धारण करण्यास व आचरण्यास अती सुलभ, परमेश्वराचा नित्य, शाश्वत, अखंड परमानंद प्राप्त करून घेण्यास उपयुक्त असा सर्वश्रेष्ठ महान तत्वज्ञानाचा सागर आहे...... जगातील सर्व शास्त्रे या ब्रम्हविद्या शास्त्रात सामावली आहेत.....

परमेश्वर भक्तांचा तारक
।महात्म्यांचा उद्धारक ।।
महानुभावीयांचा कैवल्यदाता ।
भारतीयांचा मोक्षदाता ।।

अर्थात भारतीय संस्कृतीचे जनक सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी आणि पंचकृष्ण हे ज्ञान, भक्ती, वैराग्य तसेच सत्य, अहिंसा व परमशांतीचे प्रतीक आहे....

# ।। गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया ।।

**ज्योतिर्मय साहित्य**



गणपति तुझे नाव चांगले, आवडे बहु चित्त रंगले, प्रार्थना तुझी गौरी नंदना, हे दयानिधे श्री गजानना. आज भाद्रपद शुक्ल चतुर्थी. आज गणेशाच्या अवतारांपैकी गणेशाचा जन्म झाला .गणेश चतुर्थी या दिवसाला महा सिद्धि विनायक चतुर्थी किंवा शिवा असेही म्हणतात. आजच्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाला जास्वंदाचे फूल , शमी पत्री आणि दूर्वा खूप आवडीचे असल्याने त्या पूजेत गणेशाला अर्पण केल्या जातात. गणेशाला मोदक खूप आवडतो त्या मूळे मोदकाचा नैवेद्य अर्पण केलं जातो . गणेशाला प्रसन्न केल्यामुळे घरातील वातावरण प्रसन्न होते ,त्याचप्रमाणे सुख -समृद्धी आणि शांती घराला लाभते .उंदीर हे गणेशाचे वाहन आहे व त्यावर स्वार होऊन ते इतरत्र फिरतात हे आपल्याला माहित आहेच. शाडूच्या मातीपासून बनवलेल्या गणेश मूर्तीचे पूजन केले जाते .गणेश चतुर्थी हा दिवस दहा दिवसाच्या गणेशोत्सवाची सुरुवात असते. गाणपत्य संप्रदायाचे गणेश चतुर्थी व्रत हे महिनाभर करायचे व्रत आहे .श्रावण शुक्ल चतुर्थी ते भाद्रपद शुक्ल चतुर्थी असा या व्रताचा कालावधी आहे .नदी किनारी जाऊन स्नान करावे व त्याच ठिकाणी आपल्या हातावर अंगठ्या एवढ्या मातीची मूर्ती तयार करावी. १६ उपचारांनी पूजा करून ते एका नदीत विसर्जित करावी असे हे व्रत आहे. याला पार्थिव गणेश व्रत असे म्हणतात. सोळा उपचारांमध्ये गणेशाला २१ पत्री अर्पण केल्या जातात. त्या प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्म देखील आहेत.

आज पासून प्रत्येक घरात गणपती असेपर्यंत रोज नित्यनेमाने अथर्वशिर्षाचे पठण केले जाते. गणेश गीता या ग्रंथाचे वाचन केले जाते. गणपती बाप्पांना विघ्नहर्ता (अडथळे दूर करणारे )आणि सुखकर्ता ( आनंद देणारे ) म्हणून ओळखले जाते. त्याचप्रमाणे गणपतीला बुद्धी ,समृद्धी सौभाग्याची देवता, १४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती म्हणून देखील ओळखले जाते. श्री गणेशाचे वर्णन अजम् निर्वीकल्प निराकार रूपम असे केले जाते .तो परब्रम्ह्याचे रूप आहे.

अजम म्हणजे जन्म झाला नाही असा,
निराकार म्हणजे आकार रहित असलेला,
निर्विकल्प म्हणजे विकल्प नसलेला.

गणेशा मुळे हे ब्रह्मांड आहे. त्याच्यामुळे सर्व गोष्टींना आकार मिळतो आणि अशी ऊर्जा आहे जात सारे विश्व सामावलेले आहे.

गण +पती =गणपती असा शब्द तयार झालेला आहे. संस्कृत शब्द कोशानुसार गण म्हणजे पवित्र व पती म्हणजे स्वामी. गणपती हा सर्वांचा स्वामी आहे. कुठल्याही मंगल कार्यात आधी गणेशाची पूजन केले जाते.

चतुर्थी महात्म्य :- भाद्रपद शुक्ल चतुर्थीचे महात्म्य सांगताना वशिष्ठ ऋषींनी दशरथ राजाला सांगितले की , हे राजा पूर्वी दुष्यंताचा पुत्र भरत नावाचा राजा होऊन गेला. सार्वभौम राजा म्हणून भरताची ओळख होती. राजा आणि सर्व गावकरी सुखात नांदत असताना अचानक एकदा राज्यात पाऊस झाला नाही. प्रजा त्रस्त झाली .तिचे हाल होऊ लागले. हे असे आपल्या राज्यात का घडत आहे ? या विचारणे भरत राजा दुःखी झाला . या परिस्थितीवर काय व कोणता उपाय करता येईल हे विचारण्यासाठी भरत राजा कण्व मुनींना शरण गेला. त्यांना वंदन करून म्हणाले, मुनीवर मी सनातन धर्माप्रमाणे राज्य करीत असताना माझ्या राज्यावर असे संकट का यावे ? मला यावर काहीतरी उपाय सांगावा अशी मी आपल्या चरणी प्रार्थना करतो. काही क्षण विचार करून कण्वमुनी राजाला म्हणाले, राजन जी चतुर्थी चारी बाजूने आलेले संकट नाही तर त्या चतुर्थीच्या व्रताचे तुझ्या राज्यात पालन केले जात नाही. मी तुला त्या व्रताचे महात्म्य सांगतो. मला क्रतू ब्रह्मपुत्र यांनी जे सांगितले आहे तेच मी तुला सांगणार आहे. '' गणांचा पती तो भगवान गणपती समाधी योगाने प्राप्त होतो हे खर आहे पण तू एकाक्षर मंत्राचे धारण करावे म्हणजे त्या ध्यान योगातून तू त्या विघ्नेशाला प्राप्त करशील असे मला ब्रह्मदेवाने सांगितले .त्यांनी मला एका गणेशाचा एकाक्षर मंत्र दिला. तेव्हापासून मी गणेशाची उपासना करतो. आज मला शांतीचा लाभ झालेला आहे. मी गणेशाची उपासना करत आहेत राजन मला वाटते तू गणेशाची उपासना करावी त्याने तुला शांती प्राप्त होईल आणि सर्व संकटातून तुझी सुटका होईल .कण्व मुनींनी भरत राजाला एकाक्षर मंत्राचा उपदेश केला. राजा आपल्या राजधानीत परत आला व त्यानंतर कण्व मुनीने सांगितलेल्या प्रमाणे भाद्रपद शुद्ध चतुर्थीला व्रताचे पालन केले. त्या व्रताच्या फळामुळे सर्व प्रजानन संतुष्ट झाले. काही वर्ष सुखात समाधानात राज्य केल्यानंतर राजाने मुलाला गादीवर बसवले आणि राजा तपश्चर्ये साठी रानात निघून गेला .


नारायण पांडव
छत्रपती संभाजीनगर

या तिथीला गणेश मूर्तीची स्थापना करून पूजन करावे .चतुर्थी व्रताचे आचरण करावे असे केल्याने जीवनातील सर्व कामे सफल होतात व गणेशाची कृपा प्राप्त होते.

ओम नमो विघ्नराजाय सर्वसौख्यप्रदायिने ।
दुष्टारिष्टविनाशाय पराय परमात्मने ।।

मंगलमूर्ती मोरया. मोरया रे बाप्पा मोरया रे

***


# श्रीगणेश : लोकदैवत

**ज्योतिर्मय साहित्य**



भाद्रपद शुद्ध चतुर्थीला महासिद्धी विनायकी असे ही म्हणतात.या दिवशी ''गणपती बाप्पा मोरया''हा आवाज सर्वत्र ऐकायला मिळतो.''मोरया'' म्हणजे नमस्कार. त्या दृष्टीने पाहता, ''गणपती बाप्पा मोरया'' चा अर्थ श्री गणपती बाप्पाला स्वागतम नमस्कार होय.

प्रत्येक शुभ व मंगल कार्यात सर्व प्रथम श्री गणेशाचे पूजन केले जाते. श्री गणेशाची मूर्ती व फोटो नसेल तर सुपारिचा गणपती समजून अग्रपूजन केले जाते. श्री गणेश चतुर्थी दिनी घरोघरी श्री गणेशाचे आगमन अत्यंत मांगल्यमय व आनंदी,उत्साही वातावरणात वाजत गाजत होते. या वर्षी पावसाने तडी दिली तरी सर्व गणेश भक्त श्री गणपतीच्या आगमनासाठी उत्सुक असतात. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी श्री गणेशोत्सव व श्री शिवजयंती उत्सव आरंभ केलेले आहेत. टिळकांच्या उत्सवांचा हेतू भारतीय संघटन, भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये यांचे पालन व सामाजिक ऐक्य घडवून आणणे असा होता. आज समाजासमोर अनेक आव्हाने आहेत. गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील वाढत असलेल्या भयंकर समस्या, व्यसने, विकार, प्रदूषण, महिला सक्षमीकरण, वृक्षारोपण, स्वच्छता, पाणी बचत, पर्यावरण समतोल राखणे, शिक्षण, ढासळत असलेली नैतिकता, नैतिक मूल्ये या बाबत समाज प्रबोधन काळाची गरज आहे.केवळ डीजे लावून आनंद व उत्साह मर्यादित राहू नये.श्री, गणेशोत्सवच्या माध्यमातून समाजात




अनेक रचनात्मक व विधायक कार्ये व्हावी अशी अपेक्षा आहे.

श्री.गणेशाची सेवा करतांना अगदी श्रीगणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी पर्यंत हा मोठा कालावधी आहे.या काळात समाजात विधायक व रचनात्मक कार्य करून सामाजिक ऋण फेडता येऊ शकते. गणेश मंडळांनी या कालावधीत सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणविषयक, स्वच्छता, वृक्षारोपण, महिला व मुली प्रबोधन, पाणी बचत सारखे उपक्रम राबवून सामाजिक जनजागृती करावी अशी अपेक्षा आहे.

सामाजिक उपक्रम राबवावेत व आपले सामाजिक कर्तव्य पार पाडावे अशी अपेक्षा आहे.

श्री. मूर्ती स्थापना करताना गणेश भक्तांनी रचनात्मक, सकारात्मक व विधायक कार्य करण्याचा संकल्प करून दहा दिवस सामाजिक उपक्रम राबवावेत व आपले सामाजिक कर्तव्य पार पाडावे अशी अपेक्षा आहे.

***

# आठवण लोप पावत चाललेल्या खेळांची

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय ज्ञान शाखांचे एकात्मिकरण हा नव्या प्रगत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश ठरवण्यात आला आहे .यांतर्गत कौशल्या धिष्टीत अभ्यासक्रमा अंतर्गत विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात येत आहे .मोबाईल टीव्ही समोर बसून अध्ययन करण्याच्या प्रक्रियेला किंचित बाजूला ठेवून मुलांना शाळेच्या मैदानावर लोप पावत चाललेले विविध खेळ खेळण्यास प्रवृत्त करणे ही गरज झाली आहे. गेल्या दशकापासून संध्याकाळी खेळणारी मुले दिसेनासी झाली आहेत. मातीने अंग माखलेली, हाता पायाला खर चटल्यावरही मला काही होत नाही अशा अविर्भावात पुन्हा खेळाशी ,सवंगड्याशी एकरुप होणारी मुले कुठे गेली? असा प्रश्न पडतो !

खेळामुळे शारीरिक क्षमते बरोबर संघभावना, खिलाडू वृत्ती, दबाव सहन करण्याची क्षमता, अपयश पचवणे ,प्रयत्न करत राहणे अशा क्षमता वाढीस लागतात.या मानसिक विकासातून मुलांचे बालपण फुलत जाते आणि निरोगी व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. मागील आठ दहा वर्षापासून मुलांमधील स्थूलता, आक्रस्ताळेपणा, हट्टीपणा वाढला आहे .त्यांचा संयम ढळत चालला आहे .वया अगोदरच मुले मुली प्रौढासारखी वागत आहेत. नैराश्य, अपमान त्यांना सहन न झाल्याने आत्महत्येसाठी ते प्रवृत्त होत आहेत. उच्च शिक्षित, आर्थिक दृष्ट्या सक्षम




व्यक्ती सुद्धा विपरीत परिस्थिती हाताळण्यास स्वतःला कमी समजते. हे सर्व टाळण्यासाठी शालेय जीवनापासूनच त्यांना पारंपारिक खेळाच्या माध्यमातून सक्षम, संयमी आणि सुदृढ मानसिकता असलेले नागरिक बनवण्यासाठी शिक्षकांना प्रयत्नरत होणे गरजेरचे आहे.

कोणते पारंपारिक खेळ होते बरं मग हे?

चला बघूया,

भाग पहिला_लंगडी

साधारण तीन चार वर्षाच्या मुलापासून ते अगदी दहावीच्या मुलांपर्यंत मुले आणि मुली दोघांमध्येही हा खेळ खेळला जात असे. यामध्ये समसमान दोन गट करून एका विशिष्ट मैदानातील चौकटीमध्ये राज्य आलेल्या संघातील एकाने एका पायावर तोल साधत एक पाय अलगद तरंगत ठेवत धावत धावत दुसऱ्या गटातील मुलांना बाद करायचे. जो संघ जस्त गडी बाद करेल तो विजयी असा प्रकार होता. त्यालाच लंगडी असे म्हणत. गडी निवडणे, एकमेकांना ओरडून साथ देणे, तोल गेल्यावर पडणे, खरचटणे, हार जीत संपल्यावर गळ्याभोवती हात गुंफत घरी परतणे, असे अलिखित नियम होतेच. लंगडी घालत असताना संतुलन, अचूकता या गुणांची वृद्धी होत असे. सांघिक खेळ असल्यामुळे मुलांची संघ भावनाही वाढत होती. भरपूर शारीरिक कसरत देणारा हा खेळ आताच्या काळामध्ये लोप पावत चालला आहे हे मात्र खरे ! आपल्या मुलांसोबत पुन्हा या खेळाची उर्जा अनुभवा नाहीतर इतर लोप पावलेल्या मौल्यवान गोष्टी सारखे हे खेळही नष्ट होतील!




***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559